**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : विरोधी पक्षाकडून आलेल्या नियम 259 अन्वयेच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर आता सभागृहात चर्चा सुरु होईल.

**पृ.शी.** : जैतापूर ( ता. राजापूर) भागातील जनतेचा अणु ऊर्जा प्रकल्पाला होत असलेला विरोध

**मु.शी** : जैतापूर ( ता. राजापूर) भागातील जनतेचा अणु ऊर्जा प्रकल्पाला होत असलेला विरोध या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, धनंजय मुंडे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"जैतापूर, ता.राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील नियोजित अणुऊर्जा प्रकल्पाला परिसरातील जनतेने सुरुवातीपासूनच विरोध करणे, जपान येथे झालेल्या भूकंपामुळे अणुभट्टयांमध्ये झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर जैतापूर येथील जनतेमध्ये सुध्दा असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, सिंधुदूर्ग येथील भूगर्भ शास्त्रज्ञ एम.के.प्रभु यांनी जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प अशास्त्रीय कसोट्यावर आधारित असल्याचे वक्तव्य करणे, जनतेमधील असुरक्षिततेची भावना लक्षात घेऊन तेथील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सदर प्रकल्प रद्द करण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदने करणे, स्थानिक जनतेने या प्रकल्पाच्या विरोधात केलेल्या आंदोलनात श्री.तबरेज सैदकर हा युवक गोळीबारामुळे मृत्यूमुखी पडणे, गोळीबारात एक युवक मृत्यू पडूनसुध्दा पोलिसांच्या माध्यमातून शासनाची दडपशाही सुरूच असणे, जनतेचा एवढा विरोध असून देखील शासनाने जैतापूर प्रकल्प होणारच असे धोरण स्वीकारणे, त्यामुळे कोकणातील जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पिण्याच्या पाण्यानंतर सिंचनाला दुसरा प्राधान्यक्रम देण्यात येणे, सभागृहात निर्णय घेऊन देखील खाजगी औष्णिक विद्युत प्रकल्पांना सिंचनाचे दिलेले पाणी अद्याप रद्द न केल्याने विदर्भ व कोकणातील शेतकऱ्यांमध्ये चीड निर्माण होणे, राज्य वीज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ......

नियामक आयोगाच्या आदेशानंतरही मीटर, वायरींग खर्चाची बेकायदा वसूली करुन महावितरणाने ग्राहकांना 500 कोटी रुपयांनी फसविल्याचे लक्षात येणे, वीज वितरणाचे काम खाजगी कंपनीला देण्यात येणे, त्यामध्ये खाजगी वितरण कंपन्यांनी मनमानी करुन ग्राहकांना अंधारात ठेवणे, कृषी पंपाच्या वीज जोडण्या तोडण्यात येणार नाहीत, असे आश्वासन सभागृहात देऊन देखील ते अधिकाऱ्यांनी न पाळणे, या अनागोंदी कारभारामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

प्रा. सुरेश नवले : महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविलेला माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेला नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव आहे, त्यावर आता सभागृहात चर्चा सुरु होत आहे. पण माझी मुळात या प्रस्तावावर चर्चा घेण्यालाच हरकत आहे. या अनुषंगाने मी सभागृहाचे लक्ष विधान परिषद नियमावलीतील नियम क्र. 26, पृ.क्र.18 कडे वेधू इच्छितो. त्यात "कोणताही प्रस्ताव सभापतींनी दाखल करुन घेण्यापूर्वी प्रसिध्द करता येणार नाही" असे म्हटले आहे. जर असा प्रस्ताव प्रसिध्द झाला असेल तर तो विधानसभा किंवा विधान परिषदेत स्वीकारु नये. या अनुषंगाने माझी हरकत अशी आहे की, दि. 11 ऑगस्ट, 2011 रोजीच्या "सामना" या दैनिकात हा प्रस्ताव स्वीकारला अशा प्रकारची माहिती दिली गेली आहे. दि. 25 जुलैपासून हे पावसाळी अधिवेशन सुरु झालेले आहे. अधिवेशनाचा शेवटचा आठवडा आता सुरु असून शेवटच्या दिवशी विरोधी पक्षाकडून अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पाच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली आहे. याचा अर्थ हा प्रस्ताव अगोदरच फुटलेला आहे. यापूर्वी अशाच प्रकारे एक प्रसंग उद्भवला होता, त्याची आठवण मी या क्षणाला करुन देऊ इच्छितो. माजी विधानसभा सदस्य श्री. किरीट सोमय्या हे खालच्या सभागृहात सदस्य असताना त्यांनी गुंतवणुकदारांच्या गुंतवणूकीला संरक्षण देण्यासंबंधीचे विधेयक सभागृहात मांडण्याचा प्रयत्न केला होता. पण तत्पूर्वी तो प्रस्ताव प्रसिध्द झाला होता त्यामुळे त्यांना ते विधेयक सभागृहात मांडता आले नव्हते. म्हणून हा प्रस्ताव तशाच प्रकारे फुटलेला असल्याने तो स्वीकारु नये, अशी मी विनंती करतो.

श्री. विनायक मेटे : महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव स्वीकारण्याच्या संदर्भात हरकत घेतली आहे. त्या अनुषंगानेच मी सभागृहाचे लक्ष नियम



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .......

क्र. 44, पृ.क्र. 28 कडे वेधू इच्छितो. त्यात नियम 105 च्या तरतुदीस अधीन राहून सभागृहाने त्याच अधिवेशनात ज्या प्रश्नावर निर्णय दिला असेल त्या प्रश्नाशी वस्तुत: एकरुप असेल असा प्रश्न त्याच अधिवेशनात प्रस्तावाद्वारे उपस्थित करता येणार नाही. त्यालाच अनुसरुन हा पुस्तिकेतील नियम 105 आहे. नियम क्र. 105 (1) मध्ये म्हटले आहे की, "ज्या वेळी एखादा ठराव मांडण्यात येऊन त्यावर मतदान झाले असेल तेव्हा तशाच आशयाचा प्रश्न उपस्थित करणारा कोणताही ठराव किंवा सुधारणा, आधीच्या ठरावावर मतदान झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत मांडण्यात येणार नाही." तेव्हा अशाच आशयाची व याच विषयावरील चर्चा मार्च महिन्यातील अधिवेशनात सभागृहात झालेली असताना हा ठराव विधान मंडळाने कसा स्वीकारला, यासंबंधीचा निर्णय होत नाही तोपर्यंत या प्रस्तावावर पुढे चर्चा करता येणार नाही. माझी विनंती आहे की, आपण यासंबंधीचे रुलिंग द्यावे. विरोधी पक्षाकडून तेच तेच विषय पुन: पुन: उकरुन काढले जातात व वारंवार त्याच विषयावर चर्चा केली जाते. त्या माध्यमातून जाणीवपूर्वक शासनावर हेत्वारोप करुन बदनामी करण्याचा विरोधकांचा डाव आहे व त्याला बळ देण्याचे काम विधान मंडळाने करु नये, म्हणून याबाबतचा निर्णय अगोदर होणे आवश्यक आहे. हे निव्वळ शासनाला बदनाम करण्याचे षडयंत्र विरोधकांनी चालविले आहे त्याला बळी पडता कामा नये व ते उधळून लावावे अशी मी विनंती करतो.

श्री. रामदास कदम : महोदय, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जैतापूर अणू ऊर्जा प्रकल्पावरील चर्चेलाच हरकत घेतली, याचा अर्थ ते चर्चा सुरु होण्यापूर्वीच घाबरलेले दिसतात...अडथळा......माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी असे म्हटले की, विरोधकांकडून शासनाची बदनामी करण्याचे प्रयत्न होत आहेत, शासनावर हेत्वारोप केले जात आहेत असे वक्तव्य केले. मला वाटते की, सन्माननीय सदस्यांनी फक्त नियमाचाच उल्लेख करणे गरजेचे होते, त्या व्यतिरिक्त वक्तव्य का केले हे मात्र समजले नाही. अशा प्रकारची दादागिरी सत्ताधारी पक्षाकडून होते ती चालणार नाही असेही मी सांगू इच्छितो. मला आपणाकडून संरक्षण पाहिजे ही देखील मी विनंती करतो.

.....4

श्री. रामदास कदम .........

महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी नियम क्र. 26 चा उल्लेख केला. पण कदाचित सन्माननीय सदस्यांना कल्पना नसेल की हा प्रस्ताव कालच्या कामकाज पत्रिकेत दाखविलेला होता व आज तो चर्चेला आलेला आहे. तसेच या नियमात स्पष्ट म्हटले आहे की, "कोणताही प्रस्ताव सभापतींनी दाखल करुन घेण्यापूर्वी प्रसिध्द करता येणार नाही". तसेच त्यांनी दैनिक "सामना" या वृत्तपत्रातील ज्या बातमीचा उल्लेख केला ती बातमी सुध्दा प्रस्ताव दाखल केल्यानंतरचीच आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी नियम 26 च्या अनुषंगाने प्रस्तावाला घेतलेली हरकत बिनबुडाची व चुकीची आहे असे मला सांगावयाचे आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी देखील पृ.क्र. 58 वरील नियम 105 कडे सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. त्यासंदर्भात कदाचित सन्माननीय सदस्यांचा अभ्यास कमीच असावा असे मला वाटते. कारण त्यांनी जो नियम वाचून दाखविला तो अगदी स्पष्ट आहे. तसेच मलाही कल्पना आहे की, अशा प्रकारे एखाद्या ठरावावर मतदान झाले असल्यास पुन्हा एक वर्षापर्यंत किंवा एक वर्षाच्या आत तो विषय सभागृहात चर्चेसाठी घेता येत नाही. येथे आम्ही हा ठराव दिलेला नसून तो प्रस्ताव आहे व प्रस्तावासंबंधीचे नियम अगदी स्पष्ट आहेत. असा प्रस्ताव कधीही घेता येतो. मागील अधिवेशनात सुध्दा या प्रस्तावावर चर्चा झाली होती, आजही होत आहे. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्थेचा प्रस्ताव सुध्दा मागील अधिवेशनात आणि या अधिवेशनात चर्चेला आला होता. या प्रस्तावाच्या माध्यमातून मी शासनावर कोणतेही हेत्वारोप करणार नाही तर जैतापूर प्रकल्प कसा नियमबाह्य आहे यासंबंधीच्या टेक्नीकल बाबींचा उल्लेख करणार आहे, त्या बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे. तशी कागदपत्रे सुध्दा मी सोबत आणलेली आहेत.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यामध्ये सभागृहाचा 10 मिनिटांचा वेळ वाया गेला आहे. माझी विनंती आहे की, या प्रस्तावावर विरोधी पक्षाला एक तास व सत्ताधारी पक्षाला एक तास बोलण्यासाठी अवधी मिळणार आहे. त्यामुळे एकदा चर्चा सुरु करुन ती 12 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची असल्याने लवकरात लवकर सुरु करावी.

......5

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : महोदय, काल हा प्रस्ताव कामकाज पत्रिकेत दाखविलेला असला तरी दैनिक "सामना" या वृत्तपत्राच्या कालच्या अंकात हे वृत्त छापून आलेले आहे. याचा अर्थ 10 ऑगस्ट, 2011 रोजीच या प्रस्तावाबाबतची माहिती बाहेर आली असावी. 11 ऑगस्ट, 2011 च्या विषय पत्रिकेत तो प्रस्ताव आलेला आहे, म्हणून हा प्रस्ताव स्वीकारु नये.

श्री. रामदास कदम : महोदय, 10 ऑगस्ट, 2011 रोजी रात्रीच सर्व सन्माननीय सदस्यांना उद्याच्या दिवसाची कामकाज पत्रिका मिळत असते. त्यावरुन माननीय सभापतींनी प्रस्ताव दाखल करुन घेतला असावा हे स्पष्टच होते. तसेच नियमामध्ये सुध्दा स्पष्ट म्हटले आहे की, "कोणताही प्रस्ताव सभापतींनी दाखल करुन घेण्यापूर्वी प्रसिध्द करता येणार नाही", त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा ग्राह्य धरता येणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सदर प्रस्ताव नियमानुसार का घेता येणार नाही यासंदर्भात सविस्तर माहिती दिलेली असून हा प्रस्ताव घेणे बरोबर आहे की, नाही यासंदर्भात आपण निर्णय घेणार आहात. परंतु हा प्रस्ताव आज चर्चेला घेतला जाणार नाही याची कल्पना विरोधी पक्षाला आल्यामुळेच आजच्या प्रस्तावासाठी विरोधी पक्षाची उपस्थिती नगण्य आहे. विरोधी पक्षाने हा प्रस्ताव दिलेला असतांना सुध्दा विरोधी पक्षाचा एकच सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित असणे हे काही बरोबर नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी ):** या प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनायक मेटे, रमेश शेंडगे तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम यांचे म्हणणे मी ऐकून घेतलेले आहे. एका अधिवेशनात एखाद्या प्रस्तावावर चर्चा झ ााल्यानंतर पुढील अधिवेशनामधील प्रस्तावाच्या प्रारुपामध्ये जर नवीन मुद्यांचा समावेश असेल तर तो प्रस्ताव चर्चेला घेता येतो. आजच्या प्रस्तावामध्ये काही नवीन मुद्दे अंतर्भूत असल्यामुळे या प्रस्तावाला मी मान्यता देत आहे. त्या मुळे आता सन्माननीय सदस्य श्री. रामदाजी कदम यांनी प्रस्तावावर विचार मांडण्यास सुरुवात करावी.

श्री. रामदास कदम : सन्माननीय सभापती महोदय, आपण मला प्रस्ताव मांडण्याची अनुमती दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानून आपल्याला धन्यवाद देतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांना काही तरी बोलावयाचे दिसते.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिकेतील नियम क्रमांक 42 कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

श्री रामदास कदम : सभापती महोदय, या मुद्याच्या संदर्भात आपण एकदा निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयावर पुन्हा चर्चा करता येऊ शकते काय ? सन्माननीय मंत्रीमहोदयांना आपण दिलेल्या निर्णयावर आता बोलता येणार नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे सरकार बाहेर जनतेवर गोळया घालत आहे व येथेही दादागिरी करत आहे हे बरोबर नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

**तालिका सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे हरकतीचे मुद्दे मांडले होते त्या मुद्यांवर मी निर्णय दिलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी प्रस्तावावर विचार मांडण्यास सुरुवात करावी. 11.30 वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर विचार मांडता येतील व 11.30 नंतर सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणाला सुरुवात केली जाईल याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

श्री. रमेश शेंडगे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "दादागिरी" असा शब्दप्रयोग केलेला असल्यामुळे तो शब्द कामकाजातून काढण्यात यावा.

श्री. रामदास कदम : सन्माननीय सभापती महोदय, आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला आलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्याचे उप मुख्यमंत्री, या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार या चर्चेला उत्तर देण्यासाठी सभागृहात उपस्थित आहेत. लोकांचे नागरी हक्क शासनाच्या माध्यमातून जपले जात आहेत काय ? याबाबत शासनाने प्रथमत: विचार करावा असे मला वाटते. अनेक कोकण पुत्रांनी या देशाची लक्षणीय सेवा केली असून, "स्वराज्य माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळवणारच" ही घोषणा देणारे लोकमान्य टिळक हे सुध्दा कोकणातीलच आहेत. भारत रत्न पुरस्कार प्राप्त झालेले धोंडो केशव कर्वे हे देखील कोकणातीलच आहेत, विनोबा भावे देखील कोकणातीलच आहेत, हुतात्मा अंनत कान्हेरे हे देखील कोकणातीलच आहेत, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पूर्वज देखील कोकणातीलच आहेत, तसेच डॉ. बाबासाहेबांची कर्मभूमी ही देशील कोकणातीलच आहे आणि छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी देखील कोकणामध्येच आहे.

सभापती महोदय, स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय असा प्रश्न आम्हा सगळयांना पडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने दिलेले स्वातंत्र्य खरोखरच आम्हाला प्राप्त झालेले आहे काय ? असा आम्हाला प्रश्न पडला आहे. स्वातंत्र्याच्या माध्यमातून विकासाची नेमकी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

संकल्पना काय आहे ? असा आम्हाला प्रश्न पडलेला आहे. विकास म्हणजे बंध मुक्ती, अनेक पाशातून सोडवणूक करणारा विकास आहे काय ? प्रदूषणापासून विमोचन हे शासनाचे धोरण आहे काय ? निरक्षरतेच्या मगर मिठीतून मिळणारी नोकरी म्हणजे विकास ? बेरोजगारीच्या जोखडातून आमची सुटका होणार आहे काय ? दुस-यानी केलेले निर्णय मान्य करण्याच्या सक्तीपासून मुक्ती याला आम्ही विकास म्हणावयाचे काय ? आर्थिक विकास हे केवळ साधन आहे, साध्य नाही हे प्रथमत: मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय श्री. राणे साहेब उपस्थित असून त्यांनी या विषयाच्या संदर्भात सन 2006 मध्ये जे उत्तर दिलेले आहे ते सुध्दा मी येथे सांगणार आहे. भारताचे शास्त्रज्ञ श्री. काकोडकर या विषयाच्या संदर्भात काय म्हणतात ते सुध्दा मी या ठिकाणी सांगणार आहे. पैसा म्हणजे साधन आहे, साध्य नाही हे सुध्दा मी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. रत्नागिरी जिल्हयाला शासनाने फलोद्यान जिल्हा म्हणून घोषित केलेले आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

रत्नागिरी जिल्ह्यात फलोत्पादनास चालना मिळण्यासाठी फळझाड लागवडीसाठी शासनाने 100 टक्के अनुदान दिले. या अनुदानाच्या माध्यमातून कोकणातील शेतकऱ्यांनी आंबा, चिंच, जांभूळ, नारळ अशी फळ झाडे लावली. आपण लावलेली झाडे जगण्यासाठी त्यांनी प्रसंगी तीन-चार कि.मी.वरुन डोक्यावरुन हंडे भरुन पाणी आणून ही झाडे जगविली. शेतकऱ्यांनी 10-15 वर्षा पूर्वी लावलेल्या झाडांपासून उत्पन्न मिळण्यास सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या तोंडातील घास काढण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला, असे प्रकार होत असतील तर कोकणातील शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे ते शासनाचेच सांगावे.

सभापती महोदय, शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा "पर्यटन जिल्हा" तर रत्नागिरी जिल्हा "फलोत्पादन जिल्हा" म्हणून घोषित केला. सिंधुदुर्ग पर्यटन जिल्हा म्हणून घोषित होऊनही त्या ठिकाणी पर्यटनासाठी म्हणाव्या तशा सुविधा निर्माण केलेल्या नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात चांगले रमणीय समुद्र किनारे आहेत. परंतु या समुद्र किनाऱ्यांचा चांगल्या प्रकारे विकास केलेला नाही. रत्नागिरी जिल्हा फलोत्पादन म्हणून घोषित केला. परंतु रत्नागिरीमध्ये फळांवर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे उभारले नाहीत. फळांवर प्रक्रिया करणाऱ्या लघु उद्योगांना व्हॅट लावू नका अशी मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत, परंतु या मागणीकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे.

सभापती महोदय, मागील अधिवेशनात या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, "कोकण वैधानिक विकास मंडळास लवकर मान्यता देण्यात येईल. त्या संदर्भात केंद्र सरकारकडून पत्र आलेले आहे. कोकण वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्या बाबत केंद्र सरकार कडून मंजुरी आणण्यासाठी मी दिल्लीला जाणार आहे". त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानले होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनास तीन महिने उलटून गेले आहेत. अजून त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासण्याचे काम शासनानेच केलेले आहे, असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

सभापती महोदय, मी ज्या मतदार संघाचे 20 वर्षे प्रतिनिधीत्व करीत आहे, त्या लोटे-परशुराम येथे होत असलेल्या प्रदूषणा बाबत शेकडो वेळा तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना व इतर संसदीय आयुधांच्या माध्यमातून सातत्याने प्रश्न उपस्थित केले. (अडथळा) माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे साहेब यांना मी सांगू इच्छितो की, आपण देखील विरोधी पक्ष नेता म्हणून तसेच राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, या विधिमंडळामध्ये लोटे-परशुराम येथील प्रदूषणा संदर्भात सातत्याने प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मी इतक्या वेळा प्रश्न उपस्थित करुनही मला अजून पर्यंत न्याय मिळालेला नाही. माननीय मंत्री महोदय श्री.गणेश नाईक या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांच्याकडे पर्यावरण विभागाचा कार्यभार असताना त्यांनी विधानसभेत उत्तर देताना सांगितले होते की, लोटे-परशुराम येथील औद्योगिक वसाहतीतील पाण्यामुळे खाडीतील मासे मेले तर ते मासे मी अधिकाऱ्यांना खायला घालेन. यापुढे तेथे प्रदूषण होऊ देणार नाही असे त्यांनी सांगितले. माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिल्यानंतरही तेथील खाडीतील मासे मेल्याचे अनेक वेळा आढळून आले. याचा अर्थ असा की, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होत नसेल तर शासनाच्या आश्वासनांवर कोण विश्वास ठेवणार ?

सभापती महोदय, हे सरकार जैतापूर येथे अणुऊर्जा प्रकल्प उभारणार आहे. अणुऊर्जा प्रकल्पातून किरणोत्सर्ग होणार नाही असे शासना कडून सांगण्यात येत आहे. या पूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नाही तर अणु प्रकल्पातून किरणोत्सर्ग होणार नाही या आश्वासनावर कोण विश्वास ठेवेल ? शासन वेळ मारुन नेण्यासाठी आश्वासन देते हे अनेकदा सिध्द झालेले आहे. ज्याचे उदाहरण मी आताच दिलेले आहे. माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांच्याकडे पर्यावरण विभागाचा कार्यभार असताना लोटे-परशुराम येथील प्रदूषणामुळे खाडीतील मासे मरणार नाहीत तसेच त्या ठिकाणी प्रदूषण होणार नाही असे सांगूनही त्यामध्ये काहीही फरक झालेला नाही. याचा अर्थ शासन फक्त आश्वासन देते, परंतु त्या आश्वासनाची पूर्तता करीत नाही. माननीय उप

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

मुख्यमंत्री महोदयांना मी विनंती करतो की, त्यांनी रात्री 8-9 वाजता लोटे-परशुराम भागातून जावे. आपणास त्या भागातून नाक दाबून जावे लागते अशी परिस्थिती आहे. मी जे सांगत आहे त्यामध्ये तथ्य नसल्यास मी माझी आमदारकी सोडून देईन. लोटे-परशुराम भागात प्रदूषण होणार नाही असे अनेकवेळा आश्वासन देऊनही तेथील प्रदूषण कमी झालेले नाही. तेथे होत असलेल्या प्रदूषणामुळे आजूबाजूच्या शाळेतील विद्यार्थी बेशुध्द पडत आहेत. आम्ही असे प्रश्न उपस्थित केल्यानंतर आम्हाला आश्वासना व्यतिरिक्त काहीही मिळत नाही. असे असताना शासन सांगत आहे की, अणुऊर्जा प्रकल्पातून किरणोत्सर्ग होणार नाही. शासनाच्या या आश्वासनावर कोण विश्वास ठेवणार आहे ?

सभापती महोदय, आज लोटे-परशुराम भागात हवेत आणि पाण्यामध्ये प्रदूषण होत आहे. अणुऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून एक हजार कोटी रुपये मिळत आहेत म्हणून शासन आम्हाला असत्य आश्वासन देत आहे. आज महाड येथील सावित्री नदीची काय अवस्था झाली आहे ते शासनाने पहावे. रोहा येथील रसायनीची काय अवस्था आहे, तळोजा येथे काय अवस्था आहे हे शासनाने एकदा जाऊन पहावे. तारापूर येथे काही विपरित घडलेले नाही असे शासना मार्फत सांगण्यात आलेले आहे. तारापूर येथे काय अवस्था आहे या संदर्भातील सी.डी. मी आपल्या मार्फत माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना देतो. त्यांनी ती सी.डी.जरुर पहावी अशी माझी त्यांना विनंती आहे. आज लोटे-परशुराम, रसायनी, तळोजा इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषण आहे ही बाब कोणीही नाकारु शकणार नाही. प्रदूषणाच्या विरोधात आंदोलन होतात, मोर्चे निघतात त्यावेळी सरकारकडून थातूरमातूर उत्तरा शिवाय काही मिळत नाही.

सभापती महोदय, पुढच्या पिढीसाठी आपण निसर्ग संपत्तीचे विश्वस्त आहोत असे म्हटले जाते. जी निसर्ग संपत्ती आहे...

श्री.नारायण राणे (बसून) : असे कोणी म्हटले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नवीन सदस्यांनी असे विचारले तर मी समजू शकतो. परंतु माननीय मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांनी विरोधी पक्ष नेते म्हणून तसेच मुख्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. त्यांच्याकडून मला अशी अपेक्षा नाही. त्यांना हा प्रकल्प रेटून न्यावयाचा आहे हे आम्हाला दिसत आहे...

सभापती महोदय, आज रत्नगिरी गॅस पॉवर कंपनीमधून 2200 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. जिंदाल कंपनीमधून 1200 मेगावॅट तर फिनोलेक्समधून 43 मेगावॅट निर्मिती होत आहे. म्हणजे कोकणातून कोयनेसह जवळपास 5443 मेगावॅट विजेची निर्मिती होत आहे. त्या शिवाय कोकणामध्ये खाजगी 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प घेतले आहेत. माझ्याकडे यादी आहे. या प्रकल्पांसाठी शासनाने जमिनी संपादित केलेल्या आहेत. विदर्भामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित केलेल्या आहेत. आता 20 हजार मेगावॅटचे प्रकल्प सुरु आहेत. आपल्या राज्याला विजेची किती आवश्यकता आहे ?

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

मागील 11 वर्षामध्ये आपण एक मेगावॅट देखील वीज निर्माण करु शकलो नाही याबाबत आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा. त्याचप्रमाणे आपण आपली वीज गळती देखील थांबवू शकलो नाही तर ती अधिक होत आहे. या मुळे राज्यामध्ये दरवर्षी 1 हजार मेगावॅट अधिक विजेचे उत्पादन करावे लागेल. वाढती लोकसंख्या आणि वाढते औद्योगिकीकरण या करिता अधिक विजेची आवश्यकता असतांना गेल्या 11 वर्षामध्ये आपण एक मेगावॅट इतकी सुध्दा वीज निर्माण करु शकला नाहीत. या उलट आपण 2 लाख 40 हजार कोटींचे कर्ज घेतले त्यापैकी 50 हजार कोटी खर्च केले असते तर आपण विजेचे उत्पादन वाढवू शकलो असतो परंतु तसे झाले नाही. आपण हे कर्ज कशासाठी काढले याची श्वेतपत्रिका सुध्दा काढलेली नाही. एका बाजूला आपण सारखे कर्ज काढीत आहात, ते कर्ज कशासाठी घेत आहात हे सुध्दा सांगत नाही, त्यामधील काही रक्कम वीज निर्मितीसाठी सुध्दा आपण खर्च करीत नाही. आपल्याकडे खाजगी पॉवर प्लॅन्ट असतांना संपादित केलेल्या जागेचे आपण काय करणार आहात? या जैतापूर प्रकल्पासाठी संपादित केलेल्या 938 हेक्टर जागेवर आपण हा प्रकल्प उभा करणार आहात. सन 2032 सालापर्यन्त त्यावर 10 हजार मेगावॅटचा प्रकल्प पूर्ण करणार आहात आणि त्यामध्ये 200 लोकांना नोकऱ्या देणार आहात. त्यामध्ये आवश्यक असलेल्या तांत्रिक पदांची भरती ही राज्याबाहेरुन होणार आहे.

सभापती महोदय, काल आपण मावळ येथे झालेल्या गोळीबाराची घटना पाहिली आहे, त्या ठिकाणी ज्या पध्दतीने त्या शेतकऱ्यांवर गोळीबार झाला. त्या संदर्भात पोलीस अधीक्षक श्री. कर्णिक यांनी काल सभागृहाचे कामकाज सुरु असतांना सभागृहाच्या बाहेर अधिक माहिती दिली त्याबद्दल मी त्यांच्याविरुध्द विशेष हक्कभंगाची नोटिस देणार आहे. त्या ठिकाणी श्री. साठे नावाच्या एका शेतकऱ्याला पोलिसांनी पकडले त्याचे फोटो आपल्याजवळ आहेत. तर मग त्या माणसाच्या मानेखाली गोळी कशी लागते? तुम्ही एका बाजूला शेतकऱ्यांना गोळा घालून मारीत आहात आणि दुसऱ्या बाजूला रत्नागिरी जिल्ह्यामध्ये कलम 37 अन्वये जमाव बंदीचे आदेश देत आहात. लोकशाही पध्दतीने कोणतेही आंदोलन करावयाचे झाले तर त्या ठिकाणी जमावबंदी लावली जाते. सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदय, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अशाप्रकारे 191 दिवस आपण जमावबंदी लावली आहे त्याची यादी मी आपणाकडे पाठवितो. याचा अर्थ लोकांनी मोर्चा काढावयाचा नाही,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

आंदोलन करावयाचे नाही,एकत्र जमा व्हावयाचे नाही. अशा प्रकारे लोकशाही पध्दतीने जर कुणी आंदोलन करीत असेल, न्याय मागत असेल तर त्या लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम तुम्ही करीत आहात. पोलिसांच्या माध्यमातून जमाव बंदीचा आदेश देवून दंडुकेशाही, बंदूकशाहीने ते आंदोलन चिरडायचे. जर त्या वेळी पोलीस कमी पडले तर स्वाभिमान संघटनेच्या माध्यमातून ....

श्री. नारायण राणे (बसून बोलतात) : आता मी बोललो तर चालेल?

श्री. रामदास कदम : तुमचा स्वाभिमानशी संबंध काय?

श्री. नारायण राणे (बसून बोलतात) : तुम्ही तुमचा स्वाभिमान ठेवा.

श्री. रामदास कदम : तुमचा स्वाभिमानशी संबंध काय? रत्नागिरी जिल्ह्यामध्ये श्रीमती वैशाली पाटील, माजी न्यायमूर्ती श्री. कोळसे पाटील यांना सभा घेऊ दिली जात नाही. तेथील अेसीपी श्रीमती वैशाली पाटील यांना सांगतात की, तुमच्या जीवाला धोका आहे, तुम्ही येथून निघून जा. सभापती महोदय,बाहेर तर नाही परंतु एका बंदिस्त हॉलमध्ये सुध्दा सभा घेवू दिली नाही. अशाप्रकारे पोलिसांना हाताशी धरुन या राज्यामध्ये दडपशाही सुरु आहे. तर मग तुम्ही सांगून टाका की, या राज्यामध्ये लोकशाही पध्दतीने आंदोलन करावयाचे नाही, मोर्चा काढावयाचा नाही असे सांगून टाका, तसा आपण निर्णय घेऊन टाका. पोलिसांच्या माध्यमातून आणि बंदुकीच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला आंदोलन करु देणार नाही असे जाहीर करुन टाका.

सभापती महोदय, राजापूर पोलीस ठाण्यामध्ये 55 लोकांवर गुन्हे नोंदविण्यात आले त्याची यादी मी आपणाकडे देतो. हे पाप तुमच्यापर्यंत पोहोचू द्या आणि महाराष्ट्रातील जनतेला कळू दे. तुमची हुकूमशाही, दंडेलशाही कशापध्दतीने होत आहे, तुम्ही 55 लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत. या आंदोलनाचे प्रमुख श्री. गवाणकर यांनी रस्त्यावर येवून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला म्हणून रात्री 2 वाजता त्यांना त्यांच्या घरातून उचलून नेण्यात आले. त्यांनी आंदोलन केले हा त्यांचा गुन्हा. त्या ठिकाणी या सरकारचे काम कशा पध्दतीने सुरु आहे? सभापती महोदय, त्या भागातील प्रदूषणाच्या बाबतीत आपल्यासमोर भोपाळचे उदाहरण आहे. भोपाळमध्ये झालेल्या प्रदूषणामुळे लोकांमध्ये अपंगत्व आले, नवजात अर्भकांचा जन्म न होणे, नपुंसकत्व येणे हे पिढयान् पिढया आपल्याला त्या माध्यमातून पहावयास मिळत आहे. विभागीय आयुक्त, कोकण भवन आणि जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडून माहितीच्या अधिकाराखाली मी माहिती घेतली. त्यामध्ये 690

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

हेक्टर जमीन संपादनाचे काम चालू केले. यामध्ये 150 अल्पभूधारक खातेदार आहेत आणि 768 कुटुंबे भूमिहीन होत आहेत त्याची यादी माझ्याजवळ आहे. विभागीय आयुक्तांकडून मला देण्यात आलेल्या यादीमध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, सदर जमीन संपादनामुळे 150 खातेदार हे अल्पभूधारक व 768 खातेदार हे भूमिहीन होत आहेत. प्रस्तावामध्ये खातेदारांच्या जमिनीचे माहितीपत्रक आहे. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन केल्याशिवाय सामाजिक कल्याण साधणार नाही असे प्रमाणपत्र सादर केले आहे. ही 768 कुटुंबे भूमिहीन आहेत तरी सुध्दा तुम्ही सामाजिक कल्याण साधणार नाही असे म्हणता. या 768 कुटुंबाकडे एक इंच सुध्दा जमीन आपण ठेवीत नाही तरीसुध्दा आपण त्यांचे सामाजिक कल्याण साधत आहात? सभापती महोदय, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र आपणामार्फत सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना सादर करतो.

सभापती महोदय, एकूण 11830 खातेदार असून त्यापैकी कालपर्यंत जवळ जवळ 140 लोकांना चेक देण्यात आले, त्यांचा जमिनीशी काहीही संबंध नाही, ते मुंबईला असून जमीन कसत देखील नाहीत. सभापती महोदय, आपलेच "जोशी" आडनाव धारण करणारे त्यापैकी काही मुंबईला आहेत. परंतु वर्षानुवर्षे जमीन कसत आहेत त्यांना बाजूला ठेवून 11830 खातेदारांपैकी फक्त 140 लोकांनी चेक स्वीकारले आहेत ही शासनाची माहिती आहे.

सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री आदरणीय श्री. राणे साहेब यांना तत्कालीन विधानसभा सदस्य सन्माननीय श्री. नरसय्या आडाम यांनी दि.11 डिसेंबर 2006 रोजी तारांकित प्रश्न क्र.52639 हा विचारला होता. त्या प्रश्नाला उत्तर देतांना सन्माननीय श्री. राणे साहेबांनी असे सांगितले होते की, "जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प केंद्रसरकारचा अंगिकृत व्यवसाय असून...

(अपूर्ण - यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

मौजे माडबन, कवेर, निवळी व मिटगावणे या चार गावातील खाजगी, खवी, वरकस व पोटखराब जमिनी या प्रकल्पासाठी संपादन करण्यात येत असून, त्यामध्ये बागायती जमिनीचा समावेश नाही. यामध्ये माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणेसाहेबांनी दोन गोष्टी सांगितल्या आहेत की, हा केंद्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय आहे आणि त्यात बागायती जमिनीचा समावेश नाही म्हणजेच केंद्र शासन व्यवसाय करीत आहे असे माननीय मंत्री श्री.नारायण राणेसाहेबांनी स्पष्ट केले आहे. याचा अर्थ हा प्रोजेक्ट जनहितासाठी नाही तर व्यवसायासाठी आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

मला असे वाटते की, आपण कशासाठी बोलत आहात. ते सक्षम आहेत. त्यांनी असे म्हटलेले आहे की, यामध्ये बागायती जमिनीचा समावेश नाही. मला माहितीच्या अधिकाराखाली जी माहिती प्राप्त झाली आहे, ती देत आहे आणि त्यानुसार चार गावांमधील 142 हेक्टर जागा ही बागायती आहे म्हणजे किती खोटे, दिशाभूल करणारे, चुकीचे उत्तर हे शासन सभागृहामध्ये देत आहे ते यातून स्पष्ट होत आहे. शासन ज्या काकोडकरांचा ढोल वाजवित आहे, त्यांच्या भाषणाची प्रत देखील माझ्या जवळ आहे.त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "परंतु परदेशातील तेथील कंपन्यांचे व्यवसायिक हितसंबंधही पहावे लागतात. त्यांच्यादृष्टीने . . . .

(सन्माननीय मंत्री महोदय श्री.अजितदादा पवार खाली बसून बोलतात.)

मला वेळ आहे.दादा, तुम्ही एवढी काळजी करु नका, कशाला एवढी काळजी करीत आहात? मी जास्त बोलणार नाही.आम्ही तुमचे पुढे काही काढत नाही.मी आपला आभारी आहे. धन्यवाद. सन्माननीय सदस्यांना भाषण संपविण्यासाठी किती वेळ आहे असे का विचारीत आहात? मी येथे वाचत आहे आणि मी व्यवस्थित ऐकत आहे. माझे तुमच्याकडे व्यवस्थित लक्ष आहे. तुम्ही काळजी करु नका. त्यांच्याकडे लक्ष ठेवावे लागते.

सभापती महोदय,मी मघाशी सांगितल्याप्रमाणे श्री.काकोडकर यांनी असे म्हटलेले आहे की,"परंतु परदेशातील तेथील कंपन्यांचे व्यवसायिक हितसंबंधही पहावे लागतात."त्यांच्या दृष्टीने अन्य भागाच्या व्यापाऱ्यात खरा बिझनेस असेल तर त्यांचा विचार करणे भारताला भाग होते.आपल्या देशावरील निर्बंध उठविले जावेत आणि या देशाने या क्षेत्रातील व्यापाराची संधी साधण्याच्या निमित्ताने भारताला अणुशक्ती म्हणून मान्यता द्यावी यासाठी हा देवघेवीचा व्यवहार करणे अपरिहार्य होते."आपले काकोडकर, ज्यांचे भाषण सुरु असताना माननीय मुख्यमंत्र्यांसह सगळयांना झोप येते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

ते काकोडकर. माननीय मंत्री श्री.पतंगराव कदमसाहेब, आपण देखील झोपला होतात.

श्री.नारायण राणे (खाली बसून) : हे जे रेकॉर्डवर येत आहे ते बरोबर नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या आल्या आहेत, फोटो आले आहेत त्याबाबत मी बोलत आहे. नाहीतर सगळे काढून टाकावे, वर्तमानपत्राच्या बाबतीत हक्कभंग द्यावा. श्री.काकोडकर कोण आहेत ते सांगावयास नको ? त्यांचे भाषण सुरु असताना मंत्रिमंडळातील अनेक मंत्री महोदय झोपलेले पहावयास मिळाले. मी कोणाचे नाव घेतलेले आहे काय ? तुमचे नाव घेतलेले नाही. मी असे म्हटलेले आहे की, मंत्रिमंडळातील अनेक मंत्री झोपलेले पहावयास मिळाले, त्याचे फोटो पहावयास मिळाले, ते काकोडकर असा मी उल्लेख केला आहे. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय माझ्या भाषणाचा जेवढा वेळ घेतील, तेवढा मला भाषणासाठी अधिक वेळ देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदासभाई कदम यांना सांगू इच्छितो की, आपण अर्धा तास .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला बोलू दिले जात नाही.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सदरहू विषयावरील चर्चा सकाळी 10.00 सुरु होऊन दुपारी 12.00 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. काल माननीय सभापती यांच्याबरोबर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब या सर्वांच्या देखत असे ठरले की, सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत सदरहू विषयावर चर्चा होईल. त्यातील एक तासामध्ये सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब,सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकरजी आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे तीन सन्माननीय सदस्य आणि सत्ताधारी पक्षाकडून मी स्वत:,सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे साहेब एवढे सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.सदरहू विषयावरील चर्चा 10 वाजून 14 मिनिटांनी सुरु झालेली आहे. आता आमचे म्हणणे एवढेच आहे की, आमच्यासाठी जी एक तासाची वेळ आहे, ती आम्हाला मिळावी एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आता माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जे सांगितले, त्याप्रमाणेच होईल. त्या व्यतिरिक्त काही होणार नाही. पण मी आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो की,आमची सुरुवातीची 15 मिनिटे सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी नियमाच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबतीत मुद्दा उपस्थित केल्यामुळे कमी झालेली आहेत.त्यामुळे तेवढा वेळ मिळावा.तसेच सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी मला जेवढ्या वेळा डिस्टर्ब केले आहे, तेवढा वेळ आम्हाला मिळावा.

**उप सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेबांना आणि तुम्हाला एकमेकांचा वेळ घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. तुम्ही पूर्वाश्रमीचे सहकारी आहात. त्या मुळे त्यात आम्ही हस्तक्षेप करणे हे अजूनही आम्हाला बरोबर वाटत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अशा प्रकारे सन्माननीय ज्येष्ठ मंत्री महोदयांनी अडथळे आणले असतील तर आपण हस्तक्षेप केला पाहिजे म्हणून माझी आपल्याला विनंती आहे. मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या निदर्शनास एक गंभीर बाब आणून देऊ इच्छितो.अणुऊर्जा महामंडळाकडून असे वक्तव्य करण्यात आलेले आहे की,"सदर प्रकल्प झोन-4 मध्ये आला असता तर ते धोकादायक ठरले असते. मी आपल्याकडे त्याची प्रत देतो. मी आपल्याला दहा वेळा सांगत आहे की, हा प्रकल्प झोन-4 मध्येच आहे आणि मी आपल्याकडे यासंबंधातील सगळे शासकीय पुरावे देत आहे म्हणजेच आपल्यादृष्टीने हा प्रकल्प किती धोकादायक होऊ शकतो हे लक्षात येईल. भारत सरकार, मौसम विज्ञान विभागाचे सन्माननीय जनरल मॅनेजर श्री.काकडे यांचा जो अहवाल आहे तो मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडे पाठवित आहे. त्यांनी असे म्हटलेले आहे की, हा प्रकल्प ज्याठिकाणी होणार आहे तो राजापूरचा भाग इ ाोन-4 मध्येच येतो असे त्यांचे म्हणणे आहे, माझे नाही. म्हणून कालपर्यंत या प्रकल्पाच्या बाबतीत दिशाभूल करण्यात येत होती की, हा प्रकल्प झोन-3 मध्ये आहे. परंतु तसे नाही. माझ्याकडे भारत सरकारच्या मौसम विभागाचे अधिकृत पत्र आहे. ते मी आपल्या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडे पाठवितो,त्यांनी ते पहावे. तसेच हा प्रकल्प झोन-4 मध्ये असताना देखील हाती घेण्यात येणार असेल तर मग आपल्या शासनाला मी नमस्कार करतो.कारण सत्तेपुढे शहाणपण नसते याची मला कल्पना आहे.राजापूर येथील भूकंपग्रस्त झोन-4 बाबत नकाशा आहे आणि हा शासनाचा नकाशा आहे, माझा नाही, हा शासनाचा कलरमधील अधिकृत नकाशा आहे, तो देखील आपण पहावा. याठिकाणी गेल्या 20 वर्षामध्ये 91 वेळा भूकंप झाले त्यासंबंधातील पत्र आणि 1993 सालामध्ये 6.3 रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता,त्यासंबंधातील शासनाचे पत्र माझ्या जवळ आहे. ते मी आपल्याकडे पाठवितो. ही सर्व शासनाकडील माहिती आहे, माझी काही नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, नॅशनल एन्व्हॉयरमेंट इंजिनिअरींग रिसर्च इन्स्टीट्युट यांचा रिपोर्ट आहे, माझा नाही तर केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाचा अधिकृत रिपोर्ट आहे. मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेब यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "1000 मे.वॅ.च्या अणूभट्टीतून प्रतिवर्षी 27 टन कचरा निघेल. मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, 1000 मे.वॅ.च्या अणूभट्टीतून जर 27 टन कचरा निघणार असेल तर 10,000 ......

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : वर्षभरामध्ये काय ?

श्री.रामदास कदम : होय, मी दिवसामध्ये किंवा महिन्यामध्ये म्हणत नाही तर प्रतिवर्षी 27 टन कचरा निघणार आहे. आज भोपाळमध्ये इतक्या वर्षानंतर अशी अवस्था निर्माण झाली आहे की, हा कचरा कुठे टाकावयाचा असा त्यांना प्रश्न पडलेला आहे. म्हणून 10 हजार मे.वॅ.वीज निर्मिती प्रकल्पामुळे 270 टन कचरा प्रतिवर्षी निघणार आहे,त्याचे आपण काय करणार आहात हा प्रश्न आहे.त्यामुळे आज भोपाळमध्ये जी स्थिती निर्माण झालेली आहे, तीच स्थिती उद्या कोकणामध्ये निर्माण होणार आहे. यापेक्षा तुम्ही वेगळे काय करणार आहात.त्यामुळे याबाबतीत "नीरी"चा रिपोर्ट आहे, माझा नाही, तो मी आपल्याकडे पाठवितो. तसेच जे.एन.टी.पी.च्या दोन एकांक जागेच्या संदर्भातील जो आराखडा आहे, त्याची अधिकृत प्रत माझ्याकडे आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपले भाषण दोन मिनिटांमध्ये संपवावे म्हणजे बाकीच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी देता येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला अजून दहा मिनिटांचा वेळ लागेल आणि माझ्या सहकाऱ्यांना भाषणासाठी जो पंधरा-पंधरा मिनिटांचा वेळ दिलेला आहे, त्यातील पाच-पाच मिनिटे मी घेणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : सभापती महोदय, माझा भाषणाचा वेळ कमी होणार.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तुमच्या वेळेचा प्रश्न नाही. कारण सदरहू प्रस्तावाच्या संदर्भात फक्त तीन सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील असे ठरले होते.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे बोलणार नाहीत.



**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी भाषण करण्याचा प्रश्न येतच नाही. काल या प्रस्तावाच्या संबंधात भाषण करण्यासाठी तीन सन्माननीय सदस्यांची नावे ठरलेली

होती.त्या नुसार शिवसेना पक्षाचे दोन सन्माननीय सदस्य आणि भारतीय जनता पक्षाचे एक सन्माननीय सदस्य भाषण करतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आम्हाला या विषयावर भाषण करण्यासाठी एक तास दिलेला आहे. त्यापैकी 50 मिनिटे मी भाषण करणार आहे आणि 10 मिनिटे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेब बोलणार आहेत.

**उप सभापती** : मग सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांच्या भाषणाच्या बाबतीत काय?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मग मी 40 मिनिटे बोलतो. मला माझा 10 मिनिटांचा वेळ द्याल की नाही.

**उप सभापती** : याचा अर्थ सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा वेळ कमी झाला.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तसे नाही. माझ्या भाषणासाठी जो वेळ आहे त्या पैकी पाच मिनिटांचा वेळ सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना दिला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना भाषणासाठी 15 मिनिटांचा वेळ दिलेला असला तरी मी त्यातील पाच मिनिटांचा वेळ घेणार आहे. मी याठिकाणी शासनाची अतिशय महत्वाची कागदपत्रे सादर करीत आहे. हा कोकणाचा प्रश्न आहे.

श्री.भाई जगताप (खाली बसून) : सभापती महोदय, सभागृहामध्ये कागदपत्रांची काय देवाण-घेवाण चालली आहे?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी ही कागदपत्रे शासनाला देऊन त्यांचे डोळे उघडण्याचे काम करीत आहे. कारण शासनाने झोपेचे सोंग घेतलेले आहे. तुमचीच माहिती देत आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, या प्रकल्पाचा जो प्लॅन आहे त्यामध्ये 1 किलोमीटर, 2 किलोमीटर, अडीच किलोमीटर समुद्रामध्ये पाईप टाकणार आहेत. त्या ठिकाणी आपण मच्छीमारांना जाऊ देणार आहात का, याबाबत माननीय मंत्री महोदयांच्या भाषणामध्ये खुलासा केला तर ते योग्य होईल. वेंगुर्लेकर समितीचा अहवाल असा आहे की, अणुऊर्जा स्वच्छ नाही, सुरक्षित नाही, स्वस्तही नाही. वेंगुर्लेकर समितीचा अहवाल मी आपल्याकडे पाठवतो. झाशी समितीने जो अहवाल दिलेला आहे तो संरक्षण खात्याकडे पडलेला आहे. तो अहवाल शासन बाहेर काढत नाही. आजही तो अहवाल संरक्षण खात्याकडे पडलेला आहे. झाशी समितीने स्पष्टपणे सांगितले आहे की, हा प्रकल्प कोकणातील 163 गावांसाठी विघातक आहे. भूगर्भशास्त्रज्ञ श्री. प्रभू यांनी असे म्हटले आहे की, जवळपासच्या वाडप गावातील कुटुंबांच्या घराभोवती एकाच वेळी डोंगर कोसळला आहे. झोन 4 मध्ये हा प्रकल्प असल्यामुळे तो अतिशय धोकादायक आहे. टाटा संशोधन संस्थेचा अहवाल सुध्दा स्पष्ट आहे की, अणुऊर्जा प्रकल्प अत्युच्च भूकंपप्रवण क्षेत्रात येत आहे. टाटा संशोधन केंद्राने केलेल्या सर्वेक्षणामध्ये हे स्पष्ट झालेले आहे. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा असा अहवाल आहे की, हा प्रकल्प अतिशय धोकादायक आहे आणि यामध्ये मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. वाय.एफ.मेकॅनिक, आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा सल्लागार यांचे असे स्पष्ट मत आहे की, अणुऊर्जा प्रकल्प घातकच आहे. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, ई.आर.डी.-सेफ्टी गाईड, ॲटॉमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्डाचा अहवाल माझ्याकडे आहे. 10 किलोमीटरच्या व्यासामध्ये आणि 5 किलोमीटर त्रिज्येमध्ये, या 5 किलोमीटरमध्ये समुद्र येतो तसेच 45 हजार एवढी लोकसंख्या येते आणि या गावांमध्ये भविष्यामध्ये आपण सेफ्टी गार्डच्या अनुषंगाने 5 किलोमीटरचा जो निर्णय घेतलेला आहे...

**उप सभापती** : या प्रस्तावावरील चर्चेसाठी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंतची वेळ दिलेली आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी अहवाल न वाचता फक्त त्यांचा काय अहवाल आहे एवढेच सांगत आहे. आमची पंधरा मिनिटे सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी घेतलेली आहेत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MMP/ AKN

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी सर्वच सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केले पाहिजे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये भाषण संपविणार आहे. हा जो अहवाल आहे त्यानुसार 5 किलोमीटर अंतरामध्ये 45 हजार लोकसंख्या येते. हा प्रकल्प पूर्णपणे धोकादायक आहे असा अहवाल आहे. फिश अँड वाईल्ड लाईफ, न्यू जर्सी, अमेरिका यांचा अहवाल आहे. त्या अहवालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, या अणुऊर्जा प्रकल्पामधून 40 वर्षात सागरी सृष्टीची प्रती वर्षी 20 लाख पौंड एवढी हानी समुद्रातून पाणी घेतल्यानंतर होते. पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांचा अहवाल आहे त्यावरुन यामध्ये किती असत्य माहिती सांगण्यात येत आहे हे स्पष्ट होईल. काकोडकर यांनी सांगितले की, हा प्रकल्प 25 मीटर उंचीवर असल्यामुळे भविष्यात समुद्रामध्ये कितीही लाटा आल्या तरी यामध्ये काही अडचणी येणार नाहीत. पण या अहवालामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, त्या ठिकाणी हा जो माळ आहे तो 9 मीटरपर्यंत कटींग करणार. म्हणजे कटींग करुन तो 9 मीटरपर्यंत आणणार. म्हणजे 3 किलोमीटर बाय 3 किलोमीटर बाय 16 मीटर कापून सगळी माती समुद्रामध्ये टाकणार. म्हणजे समुद्रात 3 किलोमीटर पर्यंत भरणी करणार असे या अहवालामध्ये स्पष्ट म्हटले आहे. त्यांच्या नकाशामध्ये आठ वेळा मिठगावणे गाव दाखविले आहे. माझ्याकडे नकाशा आहे. त्यांच्या नकाशामध्ये हे गाव आठवेळा कसे आले हे कळत नाही.

सभापती महोदय, माझ्याकडे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचा अहवाल आहे. त्यामध्ये माडबनच्या स्थळाचे वर्णन ओसाड असे केले आहे. माडबनचा परिसर ओसाड नाही. मी आपल्याला नकाशा दाखवतो. त्या ठिकाणी संपूर्ण जगात सापडणार नाहीत अशा प्रकारची फुलझाडे आहेत. गाडगीळ समितीच्या अहवालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, कोकणामध्ये 5 हजार मेगावॅट विजेचे उत्पादन होत आहे आणि हा घातक प्रकल्प आणू नका. त्या ठिकाणी प्रतिदिन 5 हजार 200 कोटी लीटर पाणी समुद्रातून घेणार आहात. म्हणजे 3 किलोमीटर बाय 3 किलोमीटर आणि खाली 50 मीटर असे हे समुद्रमंथन होणार आहे. ही साधी बाब नाही. माझ्याकडे फिश किल रिपोर्ट, कॅलिफोर्निया, याचा अहवाल आहे. शासन किती असत्य बोलते हे यातून कळेल. आपण ज्यावेळी समुद्राचे पाणी आत घेणार त्यावेळी कोट्यवधी मासे मरणार आहेत. हाही रिपोर्ट माझ्याकडे आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

केंद्र शासनाची राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था ही संपूर्ण देशातील क्रमांक 1 ची संस्था आहे. या संस्थेचा अहवाल माझ्याकडे आहे. या संस्थेच्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, समुद्रातील तपमान थोडे जरी वाढले तरी देखील मासे मरतील. त्या ठिकाणी 24 प्रकारचे मासे आहेत. त्या ठिकाणी जे गरम पाणी सोडणार आहेत त्या पाण्यामुळे जवळजवळ 10 किलोमीटरपर्यंतचे मासे मरणार आहेत. देशातील क्रमांक 1 वर असलेल्या राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचा हा अहवाल आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत एक नवीन जी.आर. काढलेला आहे की, 500 मीटरपर्यंतच्या आत एकही मच्छीमार बोट न्यावयाची नाही. शासनाचा यासंबंधीचा रिपोर्ट माझ्याकडे आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाचे पत्र माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, आपण त्या ठिकाणी प्रकल्प करणार असाल तर गोड्या पाण्याची गरज समुद्राच्या पाण्यावर प्रक्रिया करुन भागवावी. म्हणजे समुद्राचे पाणी गोड करुन ते वापरावे. पण या शासनाने त्या ठिकाणी कायदा मोडून 80 बोअर टाकलेल्या आहेत. त्याचा अहवाल माझ्याकडे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे असे म्हणणे आहे की, आमच्याकडे एकूण 221 निवेदने आली त्यामध्ये एकही निवेदन या प्रकल्पाला पाठींबा देणारे नाही. त्यांचे पत्र माझ्याकडे आहे. श्री. जयराम रमेश यांनी या प्रकल्पाला जी मान्यता दिलेली आहे त्यामध्ये जो प्लॅन सादर केलेला आहे तो असत्य आणि दिशाभूल करणारा आहे. त्या ठिकाणी समुद्राची माडबनची जी खाडी आहे ती भरलेली दाखविलेली आहे. म्हणजे त्या ठिकाणी मासे मरणार आहेत, पर्यावरण नष्ट होणार आहे हे दाखविलेले नाही. खाडीचे फोटो माझ्याकडे आहेत. चुकीचा प्लॅन देऊन पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी घेण्याचे काम या शासनाने केलेले आहे, हे देखील या ठिकाणी स्पष्ट होते. माझी आपल्यामार्फत या मायबाप शासनाला विनंती आहे की, एका बाजूला शासनाने नागपूरला गोळ्या घातल्या. बलात्काराची घटना घडली तेथे पोलिसांनी गोळ्या घातल्या. पंढरपूरवरुन येणाऱ्या वारकऱ्यांच्या संदर्भात जी घटना घडली त्या ठिकाणी सुध्दा पोलिसांनी गोळ्या घातल्या. काल मावळ येथे गोळ्या घातल्या. मागे जैतापूरला गोळ्या घातल्या. त्या ठिकाणी जमावबंदी लागू आहे. त्या ठिकाणी 200 पोलीस ठेवलेले आहेत. त्या पोलिसांची अवस्था

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

फार वाईट आहे. त्या पोलिसांची खाण्यापिण्याची, झोपण्याची व्यवस्था नाही. मच्छर चावत आहेत. हगवण लागलेली आहे. पोलिसांच्या माध्यमातून त्या ठिकाणी जबरदस्तीने कंपाऊंडचे काम चालू केले आहे. परवा आमच्याकडील लोक केंद्र शासनाकडे जाऊन उपोषणाला बसले आणि केंद्राला आपले गाऱ्हाणे सांगितले. पण शेवटी वाघ म्हटले तरी खाते आणि वाघोबा म्हटले तरी खाते, अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, आज मी आपल्या माध्यमातून शासनाला एवढाच इशारा देतो की, आम्ही लोकशाहीच्या माध्यमातून सगळे प्रयत्न करुनही शासनाने जर ऐकले नाही आणि जर आपण कोकणाच्या मुळावरच उठलात तर कोकणी माणूस या शासनाला मुळासकट उखडून काढल्याशिवाय राहणार नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MMP/ AKN

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, कोकणाच्या दृष्टीने, राज्याच्या दृष्टीने आणि देशाच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या बाबतीत जे समज-गैरसमज आहेत त्या सगळ्या समज-गैरसमजाची चर्चा विधान परिषदेच्या पवित्र सभागृहामध्ये घडवून आणण्याच्या संदर्भात जो प्रस्ताव सभागृहात आलेला आहे त्या ठरावाला पाठींबा देण्यासाठी आणि हा प्रकल्प कसा योग्य आहे या बाबतीत एक कोकणवासीय म्हणून, रत्नागिरी जिल्ह्याचा नागरिक म्हणून मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. हा प्रकल्प या देशातील आणि महाराष्ट्र राज्यातील पहिलाच प्रकल्प आहे असे समजण्याचे कारण नाही. यापूर्वी सुध्दा या देशामध्ये अनेक अणुऊर्जा प्रकल्प झाले तसेच राज्यामध्ये सुध्दा झालेले आहेत. हे सर्व प्रकल्प अस्तित्वात असताना, गेले अनेक वर्षे हे प्रकल्प चालू असताना त्या प्रकल्पांमधून निर्माण होणारे जे काही अरिष्ट असेल मग ते पर्यावरणाचे अरिष्ट असेल, स्थानिक विकासाचे अरिष्ट असेल किंवा आणखी काही गोष्टी असतील त्या सगळ्या गोष्टींची नोंद घेऊन ही सर्व अरिष्टे दूर करण्याच्या दृष्टीने आपल्याला प्रयत्न करावयास पाहिजे आणि अशा प्रकारचा प्रकल्प व्हावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

सभापती महोदय, आपण सर्वजण जबाबदार लोकप्रतिनिधी आहोत. या सभागृहात अनेक वर्षे काम करणारे अनेक सन्माननीय सदस्य आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्यासारखे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, विरोधासाठी विरोध करण्याच्या भूमिकेतून या विषयाकडे पाहू लागलो तर या देशाचा, या राज्याचा, या विभागाचा विकास कसा होणार याचे उत्तर तुम्हा आम्हाला शोधणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी अनेक अहवालांचा येथे उल्लेख केलेला आहे. परंतु त्यावेळी आरटीआयचा कायदा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे त्यावेळी ही कागदपत्रे उपलब्ध झाली नसावीत. हे खरे असले तरी एन्रॉन प्रकल्पाच्या वेळी सुध्दा अशाच प्रकारचे आकांडतांडव त्या भागात करण्यात आले होते. सभागृहात करण्यात आले आणि सभागृहाच्या बाहेर सुध्दा करण्यात आले. परंतु या प्रकल्पाला विरोधात आकांडतांडव करणारे नंतरच्या काळात सत्तेवर आल्यानंतर त्यांनी एन्रॉन प्रकल्पाला पाठिंबा दिला होता, ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, एखाद्या प्रकल्पाबाबत राजकीय अभिनिवेशाने विरोध केला जात असेल तर त्याबाबत सुध्दा आपण जाणून घेणे गरजेचे आहे. या राज्याचा विकास, या भागाचा विकास...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपण भाषण करीत असताना त्यांनी आपल्या भाषणात एकदाही व्यत्यय आणलेला नाही. त्या मुळे आपणही कृपया त्यांच्या भाषणात व्यत्यय आणू नये.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये कोणचेही नाव घेतलेले नाही. मला असे वाटते की, येथेच ही गोम आहे. खऱ्या अर्थाने ज्यांना त्या भागाचा विकास अभिप्रेत आहे, राज्याचा विकास अभिप्रेत आहे. ते या प्रकल्पाला विरोध करणार नाहीत. सभापती महोदय, गुहागर येथील एन्रॉन प्रकल्पाजवळ 10 फूटावर असलेल्या फळबागा आजही अबाधित आहेत. आपण सर्वांनी हे जाणून घेणे गरजेचे आहे. परंतु हा प्रकल्प होण्यासाठी कोणी तरी जबरदस्ती करीत आहे. या गोष्टीला फार महत्व न देता देश कसा पुढे जाईल, राज्य कसे पुढे जाईल, तो विभाग कसा पुढे जाईल यादृष्टीने तुम्हाला आम्हाला विचार करण्याची गरज आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

सभापती महोदय, मी गुजरात राज्यातील एकच उदाहरण आपल्याला देईन. जे चांगले काम झाले आहे त्याला चांगलेच म्हटले पाहिजे. जे आहे ते आहे. रिलायन्स इंडस्ट्रीच्या अति महागड्या तेल प्रकल्पामुळे 4 गावे विस्थापित झाली होती. परंतु त्या कंपनीने त्या गावांचे चांगल्या पध्दतीने पुनर्वसन केले आहे. ते मान्यच करावे लागेल. त्या प्रकल्पाला विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाने पाठिंबा दिल्यामुळे तेथे विकासगंगा आली. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, कोण कोणत्या बाकावर बसतो याचा विचार न करता त्या भागाचा विकास करणे, त्या जिल्ह्याचा विकास करणे, त्या मच्छीमारांचा विकास करणे असे सर्वांचे ध्येय्य असावयास पाहिजे, हा प्रकल्प होणे ही काळाची गरज आहे. हा प्रकल्प देशाच्या दृष्टीने, नव्हे कोकणाच्या दृष्टीने व तेथील जनतेच्या दृष्टीने होणे आवश्यक आहे हे मला ठामपणे सांगावेसे वाटते. या प्रकल्पाबद्दल समज गैरसमज पसरवले जात आहेत आणि ते पसरविण्याचे काम काही जबाबदार माणसे करीत आहेत. हे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. त्यामध्ये व्यक्तिगत अभिनिवेश असू शकेल, काही मतभेद असू शकतील. डॉ.अनिल काकोडकर यांच्या विषयी बोलले जात आहे. परंतु देशातील इतर प्रकल्पाबाबत डॉ.अनिल काकोडकर यांनी मांडलेले मत योग्य होते. मग या प्रकल्पाबाबत त्यांनी मांडलेले मत अयोग्य कसे असेल, आपली ही प्रवृत्ती कशा प्रकारची आहे ? या देशात प्रथम भाकरानांगल धरण झाले. तेव्हापासून त्यांनी पर्यावरणाचा विचार केला आहे. त्या धरणामुळे आजपर्यंत त्या भागाचा विकास होत आहे. पुढेही 100 वर्षे विकास होईल. त्यावेळी या तज्ज्ञांच्या माध्यमातून विचार करण्यात आला. त्या तज्ज्ञांची मते अयोग्य आहेत असे सांगून जे कोणी भाबड्या जनतेची दिशाभूल करीत असतील तर कृपया त्यांनी ती करु नये.

सभापती महोदय, तेथील लोकांमध्ये कोणत्या विषयाबाबत गैरसमज आहे त्याचे विश्लेषण मी करु इच्छितो. या ठिकाणी "पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन संस्था" व "नीरी" या संस्थांच्या अहवालाचा उल्लेख करण्यात आला आहे. सभापती महोदय, या राज्यात मराठवाड्यात किंवा विदर्भात अनेक प्रकल्प झालेले आहेत. हे प्रकल्प सुरु करण्यापूर्वी अशा संस्थांनी दिलेले अहवाल मान्य केले जातात. त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाते. मग आजच 'नीरी' च्या अहवालावर

3....



NTK/ KGS/ KTG/ MMP/ AKN/

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

प्रश्नचिन्ह का उभे करण्यात आले आहे, ते मला समजत नाही. पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन संस्थेने जो अहवाल दिला आहे त्यात नेमके काय नमूद केले आहे ? तेथील स्थानिक लोकांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्या प्रश्नांचे उत्तर त्या अहवालात दिलेले आहे. तेथील स्थानिक लोकांचे, बागायतदारांचे, मच्छीमारांचे प्रश्न काय आहेत ? या प्रकल्पामुळे तेथील जैविक विविधता लोप पावेल. या प्रकल्पातून गरम झालेले कण्डेन्स कुलिंग वॉटर समुद्रात सोडले जाणार आहे. त्यामुळे 10 कि.मी.च्या परिसरातील मासे मरणार आहेत. त्या भागातील लोकांना किरणोत्सर्गाचा त्रास होईल अशीही भीती व्यक्त केली जात आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, त्यावेळी भोपाळमध्ये झ ालेली दुर्धटना अतिशय दुर्दैवी होती, वाईट होती. त्यातून आपण काही तरी शिकलो आहोत. म्हणून शासनाने काही तरी पावले उचलली पाहिजेत. ती चिंता योग्य आहे असे मला वाटते. ज्या संस्थांनी हे अहवाल दिलेले आहेत ते आपण मान्य करीत असल्यामुळे त्याकडे शासनाला दुर्लक्ष करता येणार नाही. मी 24 त्रिज्या, 25 स्त्रिया या तांत्रिक बाबीमध्ये जाणार नाही. परंतु तेथे वेगळे वातावरण तयार केले जात आहे. तेथील मच्छिमार हवालदिल कशामुळे झाला आहे ? त्यांचे पुनर्वसन योग्य पध्दतीने होणार नाही, समुद्रातून मासे मिळाले नाही तर आपल्या उदरनिर्वाहाचे साधन बुडणार आहे, या एका गोष्टीमुळे तो हवालदिल झालेला आहे.

सभापती महोदय, तारापूरच्या अणुऊर्जा प्रकल्पाचा सुध्दा त्यावेळी अभ्यास करण्यात आला होता. अशा प्रकारच्या प्रकल्पांमुळे किनाऱ्यालगत 1 कि.मी.परिसरावर त्याचा परिणाम होत असतो. तो सुध्दा काही प्रमाणात होत असतो. त्याच्या पलीकडे होत नाही. हे मान्य करावे लागेल. कोकणातील या प्रकल्पामुळे मासेमारीवर परिणाम होईल असे म्हटले जात आहे. परंतु देशभरातील संपूर्ण किनाऱ्यावरील परिस्थिती पाहिली तर जवळच्या परिसरात आता मासेमारी केली जात नाही. म्हणून आता आपल्याकडे डिप सी-फिशिंग हा प्रकार आलेला आहे. मच्छीमार करणारे लोक तुम्हा आम्हाला सांगून डिप सी-फिशिंग करणार नाहीत. आजही मच्छिमारी करणाऱ्या ट्रॉलर्स समुद्रात 15-15, 20-20 दिवस जाऊन मासेमारी करतात. परंपरागत पध्दतीने ही मासेमारी केली जाते. मच्छीमार समाजातील गैरसमज किंवा संशय आपल्या सर्वांना दूर करावा लागेल. गरीब मच्छीमारांच्या यांत्रिक बोटीचे नुकसान झालेले असेल, पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या

4....

श्री.भाई जगताप....

बोटीचे नुकसान असेल त्यासाठी त्यांना मदत करता येईल. या लोकांचे वेगळे प्रश्न असल्यामुळे मी हे मांडले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून भौगोलिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होणार असल्याचे सांगितले जाते. त्याबाबत मी सांगेन की, त्या भागामध्ये संपादित केलेली आहे जमीन कातळ या प्रकारातील आहे. या कातळ जमिनी व्यतिरिक्त काही भागात बागायती जमीन आहे. एन्रॉनला जन्म देणाऱ्यांना हा माझा सवाल आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. खंदारे 11:10

श्री. भाई जगताप...

तेथेही 10 हजार फुटावर फळफळावळ होती. हे खरे आहे की, रत्नागिरी जिल्हा हा फळफळावळसाठी प्रसिध्द आहे. काँग्रेस राजवटीच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी रत्नागिरी जिल्ह्याला झुकते माप दिले आणि त्यामुळे कोकणामध्ये आज बागायती पहायला मिळत आहेत. कोकणामध्ये एन्रॉन प्रकल्प आला. त्या प्रकल्पामुळे आंबा, सुपारी, माड या फळपिकांवर कोणताही परिणाम झाला नाही. मी स्वत: बागायतदार आहे. या अणुऊर्जा प्रकल्पामुळे अशा गोष्टीवर परिणाम होईल असा केवळ अंदाज बांधत राहिलो, त्या बाबतीत ब-याच उलटसुलट गोष्टी बोलत राहिलो तर ते योग्य होणार नाही.

सभापती महोदय, किरणोत्सर्ग हा सर्वांत महत्वाचा प्रश्न आहे. आपल्या समोर जेव्हा हा विषय येतो त्यावेळी भोपाळमध्ये घडलेली भयानक दुर्घटना आपल्या डोळयासमोर येते. जपान मधील दुर्घटना आपल्या डोळयासमोर येतात. ज्या तज्ज्ञांनी जपान मधील दुर्घटनेची चौकशी केली त्यांनी दिलेल्या रिपोर्टनुसार जपानमध्ये सुरक्षिततेच्या बाबतीत जे तंत्रज्ञान वापरण्यात आले त्याही पेक्षा अत्याधुनिक असे तंत्रज्ञान जैतापूर या ठिकाणी वापरले जाणार आहे. जपान येथील दुर्घटना त्सुनामीमुळे झाली. तो एक नैसर्गिक आघात होता. तो अपघात कोणी घडविलेला नव्हता. उद्या जर एखादा नैसर्गिक आघात या विभागात झाला तर त्यापासून आपण कसे संरक्षण करणार यासंबंधीची काळजी सरकारने घेतलेली आहे आणि तसे जैतापूर संबंधीच्या अहवालामध्ये नमूदही केलेले आहे. मी सत्ताधारी पक्षातील एक सदस्य आहे म्हणून सरकारच्या समर्थनार्थ मी हे सांगतोय अशातला भाग नाही. हा 1200 पानाचा अहवाल आहे. त्यापैकी 200 पानावर पर्यावरणासंबंधी दिलेल्या सूचना आहेत. तत्कालीन केन्द्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांनी ज्या सूचना दिलेल्या होत्या त्या सूचनांचाही अंतर्भाव त्यामध्ये आहे. या सूचनांचे यत्किंचितही उल्लंघन होता कामा नये, या सूचना जशाच्या तशा पाळल्या गेल्या पाहिजेत आणि तसे केले तरच तेथील जनतेला आपण दिलासा देऊ शकू. ही गोष्ट खरी आहे की, या अणुभट्ट्यांसंबंधीची जपान सारखी काही उदाहरणे आपल्या समोर आहेत. या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, हा जो कचरा भूगर्भामध्ये कॉन्क्रीटच्या जागेत साठविला जातो तो तसा न साठविता त्यासाठी विशिष्ट प्रकारची वेगळी व्यवस्था या ठिकाणी करण्यात येणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, किरणोत्सर्ग हा देशाच्या दृष्टीने, राज्याच्या दृष्टीने आणि कोकणाच्या दृष्टीने मोठा चिंतेचा विषय आहे. अणुभट्टयातून निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी एक वेगळया प्रकारची व्यवस्था करण्यात येणार आहे. सरकार त्याबाबतीत अतिशय जागरुक राहून पावले उचलित आहे हे मला मुद्दाम या ठिकाणी सांगावयाचे आहे. श्री. अण्णा हजारे यांनी जैतापूर प्रकल्प झाला पाहिजे असे सांगितले. श्री. अण्णा हजारे यांनी पुनर्वसनाच्या बाबतीत.आक्षेप घेतला की,पुनर्वसनाचे प्रश्न प्रलंबित राहातात. ते रहाता कामा नयेत. या विषयासंबंधी दोन्ही सभागृहामध्ये विस्तृत चर्चा झालेली आहे. पुनर्वसनाच्या बाबतीत सरकारकडूनही काही गलथानपणा झालेला आहे हे मी नाकारत नाही, मग तो कोयना प्रकल्प असेल किंवा गोसीखुर्द प्रकल्प असेल. या प्रकल्पांचा पुनर्वसनाचा प्रश्न अजून संपलेला नाही. त्यामुळे जैतापूर येथील शेतक-यांच्या मनामध्ये पुनर्वसनाच्या बाबतीत साशंकता असणे स्वाभाविक आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रकल्पासाठी शेतक-यांच्या संपादित केलेल्या जमिनीला योग्य भाव मिळाला पाहिजे. ज्या जमिनी अधिग्रहीत करण्यात येणार आहेत त्यांना बाजार भावाने किंमत मिळाली पाहिजे. निगोशिएशन करण्यासाठी सरकारचे प्रतिनिधी नियुक्त करा आणि जमिनीचा योग्य मोबदला द्या. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक प्रकल्पग्रस्ताला नोकरी मिळाली पाहिजे. एका गोष्टीचा विचार झाला पाहिजे तो म्हणजे संपूर्ण प्रकल्पामध्ये 200 किंवा 300 नोक-या असतील आणि त्यापेक्षा प्रकल्पग्रस्तांची संख्या जास्त असेल तर मग त्यांना कशा प्रकारे न्याय देणार याचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. स्थानिकांना तर नोक-या मिळाल्याच पाहिजेत याबद्दल कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. तसेच त्या भागाचा विकास होत असताना तेथे होणारी हॉस्पिटल्स, बाजारपेठा तसेच अन्य ज्या ज्या काही कमर्शियल गोष्टी असतील त्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य द्यावे लागेल. एवढेच नाही तर या प्रकल्पाची निर्मिती होत असताना त्यासाठी निघणारी जी अनेक कॉण्ट्रॅक्टस असतील ती स्थानिकांना द्यावीत. त्यामध्ये आम्ही कोठेच नसू....(अडथळा)... एन्रॉन प्रकल्पाचे कॉण्ट्रॅक्टस् कोणाकोणाला गेले त्याची नावासहीत यादी मी पटलावर ठेवायला तयार आहे. (अडथळा)... सभापती महोदय, मी कुणाचे नाव घेतलेले नाही. या प्रकल्पाच्या कामासंबंधीची जी जी काही कॉण्ट्रॅक्टस् स्थानिकांना द्यावयाची असतील त्यासाठी

..3.



MSS/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. खंदारे 11:10

ग्रामपंचायतीची एक कमिटी नेमावी आणि त्या कमिटीच्या माध्यमातून कॉण्ट्रॅक्टस् द्यावीत. कोणत्याही राजकीय पक्षाच्या माणसाला कॉण्ट्रॅक्ट देऊ नका. आज जे येथे जोरजोराने बोलत आहेत तेच उद्या कॉण्ट्रॅक्ट घ्यायला पुढे असतील....(अडथळा).. एन्रॉन प्रकल्पाची कॉण्ट्रॅक्टस नातवाच्या नावाने, आजोबाच्या नावाने कशी घेतलेली आहेत याची माहिती माझ्याकडे आहे. या प्रकल्पाच्या विरोधी जोरजोराने बोलणारी मंडळी उद्या मंत्री महोदयांकडे येऊन सांगतील की, जरा आमचेही थोडे बघा. या प्रकल्पाच्या बाबतीत असे काही कुणाचे बघण्याचे कारण नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, जिंदाल, फिनोलेक्समध्ये कोणी कोणी कॉण्ट्रॅक्टस घेतली त्यांची नावे सन्माननीय सदस्यांनी सभागृहासमोर सांगावीत. कोणत्या पक्षाच्या कोणकोणत्या आमदारानी कॉण्ट्रॅक्टस घेतली याची माहिती सभागृहासमोर ठेवावी.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी कुणाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. मी जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. माझ्या 40 मिनिटाच्या भाषणामध्ये मी अनेक गोष्टींचा उल्लेख केला. लोटेपरशुराम एमआयडीसीमुळे नदीतील मासे मरतात अशा लोकांच्या तक्रारी होत्या. युतीच्या काळामध्ये जे साडेचार वर्षे पर्यावरण खात्याचे मंत्री होते त्यांनी त्या बाबतीत कधी बैठका घेतल्या नाहीत. कामगारांचा नेता म्हणून तेथील आंदोलन आम्ही चालविलेले होते. या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत सरकारने कडक पावले उचलून हा प्रकल्प मार्गी लावावा. या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला मी जोरदार पाठिंबा देतो. हा जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प झालाच पाहिजे अशी माझी भूमिका मांडून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H-4

MSS/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. खंदारे 11:10

**पृ.शी.**: मावळ, जि.पुणे येथे आंदोलकांच्या गाड्यांची तोडफोड

करणा-या व धावत जाणा-या आंदोलकांवर गोळीबार

करणा-या पोलिसांवर केलेली कारवाई

**मु.शी.**: मावळ, जि.पुणे येथे आंदोलकांच्या गाड्यांची तोडफोड

करणा-या व धावत जाणा-या आंदोलकांवर गोळीबार

करणा-या पोलिसांवर केलेली कारवाई यासंबंधी माननीय

गृहमंत्र्यांचे निवेदन

श्री. आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

मावळ मधील घटनेच्या संदर्भातील चर्चेला उत्तर देत असताना मी सांगितले होते की, आंदोलकांच्या गाड्या ज्या पोलीस कर्मचा-यांनी तोडल्या त्यांच्यावर कारवाई करु. त्याप्रमाणे वाहनांची मोडतोड करीत असताना काही पोलीस कर्मचारी आढळून आले. पोलीस शिपाई, एस.एस.गेंगजे, जे.एस.कोरडे, आर.बी.भागवत, व्ही.बी.नगरे, एम.एम.झंकर यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर सदर आंदोलन हाताळत असताना जमावास नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस निरीक्षक अशोक पाटील, गणेश जगन्नाथ माने हे जमावाच्या मागे धावून गोळीबार करताना आढळून आलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

वेगवेगळ्या दूरदर्शन वाहिन्यांवरुन ते दाखविण्यात आले आहे. म्हणून पोलीस निरीक्षक श्री.अशोक धुळाप्पा पाटील व उप निरीक्षक श्री.गणेश जगन्नाथ माने या दोघांनाही निलंबित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर मी सदनाला आणखी एक महत्वपूर्ण माहिती देऊ इच्छितो की, गेल्या 10-12 वर्षापासून परदेशात राहून ज्याने अनेक गंभीर गुन्हे केले होते, जो पूर्वी छोटा राजनचा हस्तक म्हणून काम करीत होता आणि अलीकडच्या काळात स्वत:ची गँग चालवित होता अशा कुख्यात गँगस्टर संतोष शेट्टी उर्फ अण्णा, वय वर्षे 48 याला बँकॉक येथून मुंबईला आणून अटक करण्यामध्ये मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेस यश आले आहे. खंडणी विरोधी पथक येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष शेट्टी हा लहानाचा मोठा मुंबईमध्येच झाला. वॉर्डन रोड येथे तो रहात होता. लहानपणापासून पैसे कमवायचे म्हणून त्याने सोन्याचे स्मगलिंग करायला सुरुवात केली. सुरुवातीला मँगलोर येथून मुंबईत सोने आणून त्याचे स्मगलिंग करणे आणि त्यानंतर हशीश, चरस, मँड्रेक्ससारख्या नार्कोटिक्सच्या धंद्यात तो शिरला. 1988 मध्ये संतोष शेट्टी याला सहार एअरपोर्ट येथे गोल्ड स्मगलिंगच्या गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली. 1993 मध्ये 600 कि.ग्रॅ. हशीश जवळ बाळगल्याबद्दल मुंबई पोलिसांनी विक्रोळी येथे अटक केली होती. गुजराथ पोलिसांनी 1600 कि.ग्रॅ. हशीश जवळ बाळगल्याबद्दल अटक केली होती. जेलमध्ये असताना शेट्टीचा परिचय दत्ता सामंत यांच्या खुनामध्ये अटकेत असणाऱ्या भरत नेपाळी याच्याबरोबर झाला होता. त्यानंतर तो दुबई आणि नंतर बँकॉकमधून आपली गँग चालवित होता. खंडणीसाठी अनेकांचा खून करणे, लोकांना धमकावणे, खून करणे, स्मगलिंग करणे अशा एका मोठ्या गँगस्टरला पकडण्यामध्ये मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचला यश आले आहे. मी क्राईम शाखेचे अभिनंदन करतो. देशामध्ये गुन्हे करुन परदेशात जाऊन आपण सुरक्षित आहोत अशा प्रकारचा जो एक मॅसेज जात होता त्याला तडा देण्याचे काम आपल्या पोलिसांनी केले आहे आणि या कामामध्ये बँकॉक पोलिसांनी खूप चांगल्या पध्दतीने सहकार्य केले, मी त्यांनाही धन्यवाद देतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जे निवेदन सभागृहासमोर वाचून दाखविले आहे त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु पुणे जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.कर्णिक यांच्याविरुध्द मी जी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे ती सूचना मांडण्याची मला संधी मिळावी, एवढीच विनंती आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जैतापूर ( ता. राजापूर) भागातील जनतेचा अणु ऊर्जा प्रकल्पाला होत असलेला विरोध

**मु.शी** : जैतापूर ( ता. राजापूर) भागातील जनतेचा अणु ऊर्जा प्रकल्पाला होत असलेला विरोध या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, धनंजय मुंडे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु....

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाबाबत मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मागील अधिवेशनात देखील या विषयासंबंधी चर्चा उपस्थित करण्यात आली होती आणि दोन्ही बाजूच्या अनेक माननीय सदस्यांनी त्या चर्चेमध्ये भाग घेऊन आपली मते मांडली होती. परंतु सत्तारुढ पक्षाकडून असे वातावरण निर्माण केले जाते की, विरोधी पक्षाचा विकासाला विरोध आहे, कोकणातील लोकांना विकास नको असे वातावरण निर्माण केले जाते. कोकणातील लोकांना कुठल्याही प्रकारचा उद्योग नको असेही सांगण्याचा प्रयत्न केला जातो. या राज्यात आघाडी पक्षाचे सरकार गेली 10-11 वर्षे सत्तेवर आहे. चर्चेमध्ये सहभागी होत असताना सत्ताधारी पक्षाकडून कायम एन्रॉन प्रकल्पाचा दाखला दिला जातो. सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पासंबंधीच्या प्रस्तावावर केलेली भाषणे आणि आज केलेली भाषणे लक्षात घेतली तर हेच दिसून येते की, एन्रॉन प्रकल्पाचा संबंध देऊन आम्ही काय केले आणि तुम्ही काय केले, एन्रॉन प्रकल्पात कोणाकोणाला ठेकेदारी मिळाली हे सांगितले जाते. कोकणातील आमचे सहकारी अशा पध्दतीचा युक्तिवाद करतात त्याचे मला अतिशय वाईट वाटते. दिनांक 18 एप्रिल, 2011 रोजी रत्नागिरी येथे पोलिसांकडून गोळीबार करण्यात आल्यामुळे एक मच्छिमार युवक हुतात्मा झाला. तरी देखील परस्परविरोधी युक्तिवाद सुरु आहेत. परंतु या गोळीबाराच्या घटनेबद्दल कोणी बोलायला तयार नाही. दंडुकेशाहीचा वापर केला जातो, शेतकऱ्यांना पोलीस गोळीबारात मारले जाते, त्यांच्यावर खटले दाखल केले जातात,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ AKN/पूर्वी श्री.शिगम 11:20

श्री.संजय केळकर....

तडीपारीच्या केसेस दाखल होतात त्याबद्दल सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य काही भाष्य करायला तयार नाहीत. केवळ कोकणी माणसाला दोष देऊन ज्या पध्दतीचे वातावरण निर्माण केले जात आहे ते योग्य नाही.

सभापती महोदय, शासन आज कोकणाच्या भूमीची प्रयोगशाळा करायला निघाले आहे. ठाणे जिल्हयापासून सिंधुदुर्ग जिल्हयाच्या सीमेपर्यंत अनेक रासायनिक उद्योगांना मंजुरी देण्यात आली आहे. एकेकाळी बेलापूर पट्टयामध्ये रासायनिक कंपन्यांच्या माध्यमातून सोन्याचा धूर निघत होता. बेलापूर पट्टयातील अनेक रासायनिक कंपन्या बंद पडल्यामुळे तेथील कामगार आज देशोधडीला लागले आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम पायदळी तुडवून मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी केली जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ हे प्रदूषण रोखण्यामध्ये पूर्णत: अपयशी ठरले आहे. त्यामुळे ठाणे जिल्हयातील रासायनिक कारखान्यांच्या माध्यमातून शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. आजही प्रदूषण नियंत्रण मंडळ शहापूर, वसई, पालघर, वासिंद येथील खाड्यामधून, नद्यांमधून रासायनिक कंपन्यांच्या माध्यमातून होणारे प्रदूषण थांबवू शकले नाही. 200 कि.मी.चे बंधन घालण्यात आले आहे असे सांगितले जाते. परंतु ठाणे आणि रायगड जिल्हयामध्ये प्रदूषण करणाऱ्या अनेक प्रकल्पांची नावे वाचून दाखविता येऊ शकतील, परंतु वेळेअभावी मी ती वाचून दाखविणार नाही.

सभापती महोदय, कोकणातील माणसांना विकास नको असे भासविण्याचा प्रयत्न केला जातो. कोकणी माणसाने त्या भागात मोठमोठे प्रकल्प स्वीकारले आहेत. ठाणे जिल्हयात नवीन उद्योग येत आहेत. रत्नागिरी जिल्हयात 200 कि.मी. परिसरात अनेक प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या नवीन उद्योगांना अद्याप परवानगी मिळाली नसेल, परंतु इतक्या मोठ्या प्रमाणात त्या परिसरात उद्योग आणण्याची शासन हिंमत कशी करते? सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मायनिंगच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु आहे, ते त्वरित थांबविले पाहिजे. परंतु त्या प्रकरणात शासन कार्यवाही करण्यास तयार नाही. सभागृहात शासनातर्फे पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ठामपणे अमुक करु, तमुक करु असे आश्वासन दिले जाते. परंतु प्रत्यक्षात कृती केली जात नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये इतक्या मोठया प्रमाणात उद्योगांना मंजुरी देऊन कोकण परिसराची प्रयोगशाळा केली जात आहे का, कोकणी माणसांवर प्रयोग करायचे आहेत का? असे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाले आहेत. कोकण क्षेत्रात मोठया प्रमाणात बागायती आहे, कोकणाला कॅलिफोर्नियाची उपमा दिली जाते, कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा जाहीर केला जाऊन त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न शासनाने केला. कोकणी माणसाची ही भूमिका आहे की, जगातील पर्यटक कोकण क्षेत्रात आले पाहिजेत. आंबा, काजू या फळ पिकाना जगभर बाजारपेठ मिळाली पाहिजे. परंतु सत्ताधारी पक्ष याच्या उलट भूमिका घेत आहे. अनेक प्रकारचे प्रदूषण करणारे प्रकल्प त्या भागात आणले जात आहेत. गुजराथचे उदाहरण दिले जाते, देशातील वेगवेगळ्या अणुउर्जा प्रकल्पांचे उदाहरण दिले जाते. जैतापूर हा देशातील सर्वात मोठया अणुऊर्जा प्रकल्प आहे. चार टप्प्यात 16 हजार मे.वॅट वीज तेथे उत्पन्न केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात दोन संच उभारुन 3300 मे.वॅट आणि दुसऱ्या टप्प्यात 6 संच उभारुन 9000 मे.वॅट वीज निर्मिती केली जाणार आहे. देशात एकूण 20 अणुऊर्जा प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. जैतापूर प्रकल्पासाठी 976 हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. 1.80 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक या प्रकल्पाच्या माध्यमातून होणार आहे व फ्रान्स देशाकडून 25 वर्षे अणु इंधन पुरविण्याचा करार करण्यात आला आहे. महाराष्ट्राला सध्या 15 हजार मे.वॅट विजेची गरज असून 10 हजार मे.वॅट वीज उत्पादन केली जात आहे व 5 हजार मे.वॅट विजेची तूट भासत आहे. अस्तित्वात असलेल्या वीज प्रकल्पांची काही प्रमाणात दुरुस्ती करण्याची गरज आहे. राज्यातील जून्या वीज प्रकल्पांची क्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे योग्य ती दुरुस्ती केल्यास काही प्रमाणात वीज उत्पादन वाढण्यास मदत होऊ शकते.

सभापती महोदय, शासन जैतापूर प्रकल्पाच्या माध्यमातून कोकणातील माणसाला उद्‌ध्वस्त करावयास निघाले आहे. मागील चर्चेच्या वेळी असे सांगण्यात आले की, प्रकल्प उभारला नाही तर विकास कसा होईल, देश कसा पुढे जाईल? कोकणातील माणसांनी आतापर्यंत खूप सहन केले आहे. रत्नागिरी जिल्हयात जिंदाल प्रकल्प, फिनोलेक्स प्रकल्प उभा राहिला. कोकणी माणसाने शांतपणे हे प्रकल्प स्वीकारले. आतापर्यंत किती वेळा आंदोलने झाली त्याच्या तारखा माझ्याकडे उपलब्ध आहेत. 191 वेळा कोकणातील माणसांनी निरनिराळ्या प्रकल्पांच्या विरोधात शांतपणे आंदोलने केली. परंतु कोणत्याही परिस्थितीत जैतापूर प्रकल्प उभा करायचा सरकारने ठाम निश्चय केला असेल तर मागच्या अधिवेशनात जे उत्तर दिले तेच उत्तर आजही दिले जाईल.

..5..

श्री.संजय केळकर....

सभापती महोदय, साखरी नाटे हे 8 हजार वस्तीचे गाव आहे. 40 हजार टन मासळी त्या ठिकाणाहून निर्यात होते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KT/ AKN/ पूर्वी श्री. भोगले..... 11:30

श्री. संजय केळकर .......

आज या भागातील मच्छिमार कोणत्या अवस्थेत आहे, याची सर्वांनाच कल्पना आहे. 100 कोटीपेक्षा जास्त रकमेची उलाढाल या ठिकाणाहून होते. दरवर्षी कोकणातून 4.25 लाख टन इतके मासे निर्यात होतात त्यात अर्धी निर्यात ही रत्नागिरी जिल्ह्यातूनच होत असते. अशा प्रकारे साखरी-नाटे व माडबन भागातील प्रकल्पग्रस्तांची संख्या 2500 च्या वर आहे. या प्रकल्पामुळे कोकणाचा विकास होईल असे शासनाकडून समर्थन केले जाते पण प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष जी गावे बाधित होत आहेत त्या गावा-गावांत जाऊन तेथील लोकांशी संवाद साधावा व त्यांना कन्व्हिन्स करावे की, या प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होणार नाही, समुद्राचे पाणी कमी होणार नाही, तसेच समुद्राचे पाणी गरम होणार नाही, हे त्यांना पटवून दिले पाहिजे. पण असे न करता केवळ बंदुकीच्या जोरावर आंदोलन चिरडायला लागले तर ते कदापि सहन केले जाणार नाही असेही मी सांगू इच्छितो. या प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या लोकांची पुनर्वसनाची यादी शासनाने दिलेली आहे. पण मी या निमित्ताने शासनाच्या व सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, यापूर्वी राज्यात जे जे मोठे प्रकल्प केले आहेत, त्यात कोयना प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्यापही मिटलेला नाही. असे प्रश्न मी अनेक वेळा सभागृहात मांडले आहेत. या भागातील काही लोक ठाणे व रायगड जिल्ह्यात राहण्यासाठी आले आहेत, त्यांच्या प्रश्नावर देखील सभागृहात अनेक वेळा चर्चा केली आहे. तसेच संगमेश्वर तालुक्यात जे प्रकल्प शासनाने घेतले त्यातील प्रकल्पग्रस्तांना अद्यापही न्याय दिलेला नाही. त्यामुळे जनतेचा शासनावरील विश्वासच उडालेला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

महोदय, प्रकल्प हाती घेत असताना शासनाकडून रोजगार देण्यात येईल तसेच मोबदला सुध्दा पुरेशा प्रमाणात देण्यात येईल अशा प्रकारचे केवळ गाजर दाखविण्यात येते त्यामुळे कोकणातील बाधित शेतकरी या प्रकल्पाच्या बाबतीत साशंक आहेत, अस्वस्थ आहेत. अशा प्रकारचे प्रकल्प लादून कोकणातील माणसाला उद्ध्वस्त करण्याचे शासनाने ठरविले आहे काय, याचे उत्तर मिळाले पाहिजे. या प्रकल्पाच्या संदर्भात शासनाने माहिती देत असताना अनेक प्रकारे प्रकल्पाचे समर्थन केले आहे, त्यात निरनिराळ्या तज्ज्ञांची मते सुध्दा सांगितली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी प्रकल्पाच्या समर्थनार्थ काही कागदपत्रे देखील माननीय सभापतींकडे दिली

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ........

आहेत. पण जनतेच्या मनात आजही असा संभ्रम आहे की, 11 मार्च, 2011 रोजी जपानमधील फुकुशिमा अणू भट्टीत जो विनाशकारी भूकंप झाला व त्याचा परिणाम म्हणून या अणु भट्टीतून मोठ्या प्रमाणात किरणोत्सर्ग सुरु झाला. या प्रकारामुळे कोकणातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील जनता हादरुन गेली आहे. त्यामुळे देशातील जनतेला अशी भीती वाटते की, जर अशा प्रकारचा अणु ऊर्जा प्रकल्प कोकणातील जैतापूर येथे झाला तर काय परिणाम होतील ?

महोदय, या प्रकल्पाचे समर्थन करीत असताना राज्यात मोठी गुंतवणूक होणार आहे, देशासमोरील विजेचे संकट दूर होणार आहे असेही सांगण्यात आले. त्याचा दूरगामी परिणाम मात्र कोणीही विचारात घेत नाही, असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. कोकणात देवगड किंवा रत्नागिरीमध्ये निर्यातीसाठी मोठ्या प्रमाणात हापूस आंबा पिकतो. हापूस आंबा हे इतके नाजूक फळ आहे की, त्याला कोणत्याही प्रकारे प्रदूषणाचा त्रास झालेला चालत नाही. म्हणून या प्रकल्पामुळे या भागातील बागायतदार उद्ध्वस्त होणार आहे. अगोदरच सिंचनासारख्या सोयींपासून वंचित असलेल्या कोकणातील शेतकऱ्यांचे या प्रकल्पामुळे फार मोठे नुकसान होणार आहे. आज कोकणात तसेच बंदर पट्टयातील प्रकल्पांना केवळ प्रशासकीय मंजुरी देऊन प्रलंबित ठेवलेले आहे, त्यांना पूर्ण करण्याचा विचार मात्र हे शासन करीत नाही.

महोदय, या प्रकल्पासाठी जे आंदोलन झाले होते त्यात श्री. तरबेज सैदकर या आंदोलकाला पोलिसांनी केलेल्या गोळीबारात प्राण गमवावा लागला. आता चार दिवसांपासून मावळ भागातील पवना धरणाच्या संदर्भातील आंदोलकांचा विषय सुरुच आहे. या निमित्ताने मला शासनाला विचारावयाचे आहे की, बंदुकीच्या जोरावर जनतेचा बळी घेऊन प्रकल्प राबविण्याचा विचार शासन करीत आहे काय ? एवढेच नव्हे तर या राज्यात अनेक गोष्टी धाक-दपटशाने करण्याचाच प्रयत्न शासनाकडून होत आहे. विकास म्हणजे जबरदस्ती नाही, विकास म्हणजे विनाश नाही तर विकासाचा अर्थ स्वातंत्र्य, बंधमुक्ती आणि शक्तीपासून मुक्ती असा होतो, याच आधारे शासनाने राज्याचा विकास करावा अशी माझी विनंती आहे. त्याचबरोबर कोकणातील लोकांना विश्वासात घेतल्याशिवाय, या भागातील गावकऱ्यांची जोपर्यंत मान्यता मिळत नाही तोपर्यंत हा प्रकल्प करु नये म्हणून या प्रकल्पाचा पुनर्विचार करावा अशी माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे. एवढे बोलून माझे बोलणे संपवितो.

-------



PFK/ KT/ AKN/ पूर्वी श्री. भोगले..... 11:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून ज्या जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पावर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात चर्चा सुरु केली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रकल्पाच्या संदर्भात मी थोडक्यात व मुद्देसूद बोलणार आहे. आताच येथे शासनाच्या वतीने सांगण्यात आले की, हा कोकणातील नव्हे तर देशातील एक "सुपर ॲम्बिशस", एक अति-महत्वाकांक्षी असा प्रकल्प आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूर प्रकल्पाच्या निमित्ताने हे प्रकाशात आले आहे. वास्तविक एवढा महत्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यासाठी "अरेवा" ही कंपनी खरोखरच समर्थ आहे काय हा महत्वाचा प्रश्न आहे. या कंपनीचा इतिहास बघितला तर यामध्ये ऑलरेडी कंपनीने आपल्याला जवळपास 42 टक्के प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी उशीर झाला असल्याचे कळविले आहे. तसेच सभागृहात आताच उल्लेख झाला की, या भागातून 40 हजार टन मासे केवळ साखरी-नाटे या एकट्या बंदरातून दर महिन्याला निर्यात होतात. या सर्व मच्छीमारांचे प्रकल्पामुळे फार मोठे नुकसान होणार आहे. त्याचबरोबर 15233 हेक्टरमध्ये हापूस आंब्याची लागवड आहे, त्याचेही नुकसान होणार आहे.

महोदय, या प्रकल्पाच्या अनुषंगाने आमची भीती अशी आहे की, या प्रकल्पातील रिॲक्टर लिक झाला तर काय परिणाम होतील याची चर्चा मात्र शासनाने समर्थन करताना केली नाही. कारण आता नुकताच जपानमधील फुकुशिमाचा अपघात झाला त्यामुळे हा प्रश्न सर्वांच्याच मनात निर्माण झालेला आहे. साध्या जहाजाची गळती सरकार थांबवू शकत नाही मग प्रकल्पाचा रिॲक्टर लिक झाला तर काय होईल हे सांगण्याची गरज नाही. यापूर्वी जगात अशाच अणु भट्टयांमध्ये एकूण तीन अपघात झालेले आहेत. त्यात मिड आयलॅन्ड, चर्नोविल आणि तिसरा फुकुशिमा या ठिकाणी हे ॲक्सीडेंट झालेले आहेत. अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष श्री. अनिल काकोडकर यांना मी एक प्रश्न विचारला होता पण त्यांनी "न्युक्लिअर वेस्ट" चे काय होणार या माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मात्र टाळले होते. यासंदर्भात शासनाकडून सांगण्यात आले की, न्युक्लिअर वेस्टे जे अशा अशा प्रकारे डंप करण्यात येणार आहे. पण माझ्याकडे एक रिपोर्ट आहे तो मी फक्त वाचून दाखवितो. "The principal concern about buried waste is that it might dissolve in ground water and contaminate food and drinking water

...4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ..........

supplies. How dangerous is this material to eat or drink? When first buried, it is highly toxic, and a fatal dose (yielding a 50 percent chance of death) is only 0.01 ounce. However, after 100 years the fatal dose is 0.1 ounce, and after 600 years it is one ounce making it no more toxic than many common household chemicals and medicines. After 10,000 years a lethal does is 10 ounces"

महोदय, न्युक्लिअर वेस्टेजचे नेमके काय करणार यासंबंधी शासनाने मुद्देसूद उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे. या प्रकल्पात प्ल्युटोनियम हा एक घटक आहे तो उत्सर्जित होतो, अशा प्रकारे उत्सर्जित झालेला हा घटक जवळजवळ 24 हजार वर्षे वातावरणात राहतो. त्याच्या बरोबर युरेनियम, अमेरिकम, ट्रिटीयम आणि सीसीएम हे घटक देखील उत्सर्जित होतात, त्यांचे मानवी जीवनावर काय परिणाम होतात हे देखील शासनाने उत्तरामध्ये सांगितले पाहिजे. तसेच या उत्सर्जनामुळे कोण-कोणत्या प्रकारचे नुकसान होणार आहे असे आपल्या तज्ज्ञांनाही विचारावे.

महोदय, संपूर्ण जगात एकूण ज्या 52 ठिकाणी अशा प्रकारचे न्युक्लिअर प्लांट आहेत, त्यात जवळपास 33 सिरियस ॲक्सीडेंट झाले. आता सन 2011 मध्ये जो फुकुशिमा येथे अपघात झाला तो त्याच अणु भट्टीतील दुसरा अपघात आहे. त्यानंतर बेल्जियम, स्वीडन, यु.एस., यु.के., अर्जेंटिना या सर्व ठिकाणी असे अपघात झालेले आहे. या भागात इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी रिपोर्ट प्रमाणे 6000 ते 9000 कॅन्सरचे पेशंट्स आहेत. विशेष करुन थॉयरॉईड, कॅन्सर, ल्युकेमियाचे चर्नोविलमध्ये जवळपास 9000 पेशंट्स आहेत. भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचा अहवाल सभागृहात देखील मांडण्यात आला होता. त्यातही म्हटले आहे की, बीएआरसी मध्ये आतापर्यंत 150 शास्त्रज्ञ मृत झालेले आहेत. हे सर्व अणुशास्त्रज्ञ आहेत, त्यांनी देखील मागील 15 वर्षात आत्महत्या तरी केल्या किंवा त्यांचा मृत्यू तरी झालेला आहे. जर अणुशास्त्रज्ञांना इतके मोठे कवच वापरुन सुध्दा कॅन्सर होऊ शकतो तर साधा माणूस, कोकणात राहणाऱ्या साध्या माणसाला का कॅन्सर होऊ शकणार नाही याचे मेडिकली, सायंटिफिकली उत्तर मिळाले पाहिजे, त्या भागातील जनतेची सुध्दा हीच अपेक्षा आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

या प्रकल्पामुळे आम्हाला कोणकोणते रोग होऊ शकतात व त्या रोगापासून आम्ही कसा बचाव करु शकतो याचे उत्तर राज्य शासन जोपर्यंत जनतेला देणार नाही तोपर्यंत या ठिकाणच्या जनतेच्या मनातील भीती दूर होणार नाही. अणू प्रकल्पाच्या संदर्भात दोन वेगवेगळ्या मतांच्या शास्त्रज्ञांचे कधीही एकमत झालेले नाही तसेच यासंदर्भातील भीती दूर करण्याचा प्रयत्न राज्य शासनाने कधीही केलेला नाही. जनतेच्या मनातील किरणोत्सर्गाचा धोका आपण कसा काय दूर करणार आहात ? कोकणामध्ये आपले नातेवाईक असते तर आपण सुध्दा आमच्या सारखाच विचार केला असता असे मला वाटते.

सभापती महोदय, हा प्रकल्प थंड करण्यासाठी समुद्राच्या पाण्याचा वापर होणार असून या प्रकल्पातील गरम पाणी समुद्रात सोडले जाणार आहे. प्रकल्पासाठी समुद्राचे पाणी वापरले जाणार असल्यामुळे त्या पाण्यात मिठाचे प्रमाण जास्त असल्यामुळे पाईप लाईन्स गंजतील व त्यामुळे पाईप लाईन लीकेज होण्याचे प्रमाण जास्त राहणार आहे त्यामुळे पाईप लाईन्स 99 टक्के गंजणार आहेत त्यामुळे हा प्रकार आपण कसा काय टाळणार आहात ?

सभापती महोदय, हा प्रकल्प भूकंप प्रवण क्षेत्रात नाही असे सांगितले गेले. हा प्रकल्प भूकंप प्रवण क्षेत्रात कसा आहे हे सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम यांनी उदाहरण देऊन पटवून दिलेले आहे. जपानच्या अणुभट्टीतून किरणोत्सर्ग झाला होता त्यावेळेस तेथे 6-7 रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता परंतु एकदा भूकंप झाल्यानंतर पुढील भूकंप जास्त रिश्टर स्केलचे होत असतात.

हा प्रकल्प टेकडीवर असल्यामुळे त्सुनामीच्या लाटा तेथपर्यंत पोहचणार नाही असे सांगितले गेले आहे. परंतु काक्रापाराचे उदाहरण घेतले तर 2007 मधील त्सुनामीच्या लाटा जवळ जवळ 13 मीटर उंची पर्यंत गेल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे या ठिकाणी सुध्दा त्सुनामीच्या लाटामुळे हा प्रकल्प लिकेज होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. फुकुशिमाच्या अणूभट्टीतून किरणोत्सर्ग झालेला आहे त्यामुळे जैतापूरच्या प्रकल्पाच्या संदर्भात सुध्दा आपल्याला त्याबाबतीत विचार करावा लागणार आहे.

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, पॉलिटीकली आम्ही काय म्हणतो, तुम्ही काय म्हणता यापेक्षा या विषयावर शास्त्रज्ञांबरोबर अकॅडमीक चर्चा करण्याचा राज्य शासन का प्रयत्न करीत नाही ? असा माझा या निमित्ताचे सवाल आहे. न्युक्लिअर वेस्टचे काय होणार या साध्या प्रश्नाचे उत्तर सुध्दा भारताचे शास्त्रज्ञ श्री. काकोडकर देऊ शकलेले नाहीत. जोपर्यंत या प्रकल्पाच्या संदर्भात असलेली जनतेच्या मनातील भीती राज्य शासन घालवणार नाही तोपर्यंत कोणताही कोकणी माणूस आपल्यावर विश्वास ठेवणार नाही. जर आपल्याला बंदुकीच्या जोरावर प्रकल्प आणावयाचा असेल तर अणुभट्टी तयार करण्यापेक्षा बंदुकीच्या गोळया निर्माण करणारा कारखाना आपण काढला तर अधिक बरे होईल.

सभापती महोदय, जैतापूर अणु प्रकल्प आणावयाची अति महत्वाकांक्षा असेल तर आपण कोकणामध्ये पुन्हा एकदा नरसंहार करणार आहात हे मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी हा अणु प्रकल्प आलाच पाहिजे असे जे मत प्रदर्शित केले आहे त्याचे मला फार दुःख होत आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल प्रथमत: आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, जपान मध्ये भूकंप झाल्यानंतर त्या ठिकाणी जी काही परिस्थिती निर्माण झाली त्या परिस्थितीचा फायदा जास्तीत जास्त कशा पध्दतीने उचलता येईल यासाठी विरोधी पक्षाने हा प्रस्ताव आणल्याचे दिसून येत आहे. जनतेच्या असुरक्षिततेच्या भावनेच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा केली गेली. या विषयाच्या संदर्भात माझे मत असे आहे की, खरी असुरक्षिततेची भावना जनतेमध्ये नाही तर ती विरोधी पक्षामध्येच निर्माण झालेली आहे. विरोधी पक्षामध्ये असुरक्षिततेची भावना का निर्माण झाली याचे कारण मला असे वाटते की, जैतापूर अणु प्रकल्प झाला तर महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण देशाला विजेचा पुरवठा होऊन विजेचा तुटवडा संपेल व विजेचा तुटवडा संपला तर विरोधी पक्षाला या राज्यामध्ये पुन्हा सत्तेमध्ये येण्याची संधी मिळणार नाही हे यातून सिध्द होते.

सभापती महोदय, यांच्याच पक्षाच्या नेत्याने या विषयाच्या संदर्भात एक मुलाखत दिली होती व मुलाखतीमध्ये यांच्या नेत्यांनी असे सांगितले होते की, "टाटाच्या नॅनो प्रकल्पाला लोकांनी विरोध केला, तेथून प्रकल्प घालवला, लोकांना वाटले की, ममता बॅनर्जीने बंगालमधून नॅनो प्रकल्प घालवल्यामुळे त्यांना निवडणुकीत मोठा फटका बसेल पण बंगालच्या लोकांनी ममता बॅनर्जींना भरभरुन मते दिली." ज्या प्रमाणे ममता बॅनर्जींनी बंगालमधून नॅनो प्रकल्प घालवला तशाच पध्दतीने आपण कोकणातील अणु प्रकल्प घालवला तर त्यातून आपल्याला सत्ता मिळू शकेल अशा प्रकारची सत्तेची स्वप्ने विरोधी पक्षाला पडू लागल्यामुळेच विरोधी पक्षाने जैतापूरच्या अणु प्रकल्पाचा प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षाने एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडवण्याची भाषा केली होती व हे जेव्हा सत्तेमध्ये आले तेव्हा हाच प्रकल्प त्यांनी पुन्हा अरबी समुद्रातून वर काढून सुरु केला. खरे म्हणजे एन्रॉन प्रकल्प सुरु केल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. एन्रॉन प्रकल्पामुळे आज काही प्रमाणात तरी विजेची गरज भागवली जात आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, ममता बॅनर्जी यांनी जे म्हटले ते त्यांनी सिध्द करुन दाखविले. परंतु विरोधी पक्ष सातत्याने दुटप्पी भूमिका घेत असल्याचे महाराष्ट्रातील जनतेला आढळून आलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणच्या बागायती जमिनीच्या संदर्भातील आकडेवारी दिलेली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, बागायती जमिनीचे आणि कोरडवाहू जमिनीचे दर वेगवेगळे करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणच्या जिल्हाधिका-यांनी प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीचा दर 9 लाख रुपये करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. यासंदर्भात माझी सूचना आहे की, जी जमीन बागायती आहे, त्यावर झाडांची लागवड करण्यात आलेली आहे अशा जमिनीचे दर वेगळया पध्दतीने ठरविले गेले पाहिजेत, त्यासाठी ॲसेसमेंट केले पाहिजे. या ठिकाणी जमिनीचे बाजारभाव काय आहे, जमिनीवर किती इन्व्हेस्टमेंट झालेली आहे या सर्व गोष्टीचा विचार करुन जमिनीचे दर ठरविले गेले तर त्याचा फायदा शेतक-यांना निश्चितपणे मिळू शकेल.

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्पामध्ये एका आंदोलकाचा मृत्यू झालेला आहे. परंतु याबाबत मला असे नेहमी वाटते की, जी आंदोलने केली जातात त्यामध्ये लोकांची माथी भडकावून त्यांना पुढे केले जाते व त्यामध्ये आंदोलकांचा, शेतक-याचा किंवा कार्यकर्त्याचा बळी जातो परंतु अशा आंदोलनामध्ये एखाद्या नेत्याचा बळी का जात नाही याचा विचार जनतेने सुध्दा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेहमी वेगवेगळया पध्दतीने लोकांची माथी भडकावण्याचे काम करीत असतो. आतंराष्ट्रीय व्यासपीठावर जे विकसनशील देश आहेत त्यांचा विकास खुंटला तर ते देश विकसनशीलच राहावेत यासाठी षड्यंत्र रचले जात असते. तशाच पध्दतीचे षड्यंत्र स्थानिक लोकांना हाताशी घेऊन ही मंडळी करीत आहे. ज्या प्रकल्पामुळे देशाची प्रगती होणार आहे असे प्रकल्प बंद पाडण्याचे षड्यंत्र या मंडळी कडून रचले जात आहे. अशा षड्यंत्रामध्ये या मंडळींचाही समावेश आहे की, नाही याचीही चौकशी करण्याची नितांत आवश्यकता आहे.

..5..

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

**तालिका सभापती** (श्री. रमेश शेंडगे): सभागृहाची वेळ 12.30 वाजेपर्यंत वाढविण्यात आलेली असून सभागृहाची नियमित बैठक 12.45 वाजता सुरु होईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, भाक्रानांगल धरण ज्यावेळेस या देशात तयार झाले तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सांगितले होते की, "मानवाचा विकास करावयाचा असेल तर त्यासाठी आपल्याला विज्ञानाची कास धरावी लागेल. भाक्रानांगल धरण हे आधुनिक भारताचे शिल्प आहे". जैतापूर अणु प्रकल्प हा देशाच्या विकासाचा माईल स्टोन राहणार असून ते आधुनिक भारताचे शिल्प आहे त्यामुळे जैतापूर अणु प्रकल्प झालाच पाहिजे असे मी या निमित्ताने नमूद करु इच्छितो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत तर सत्ताधारी पक्षाकडून सर्वश्री भाई जगताप आणि प्रकाश बिनसाळे यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर आपली मते मांडली.

सभापती महोदय, मागील अनेक दिवसांपासून जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्पाच्या संदर्भातील चर्चा गाजत आहे. या चर्चेमध्ये वरील पाच सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला म्हणून त्यांना मी धन्यवाद देतो. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत या पूर्वी देखील सर्व पातळ्यांवर सातत्याने चर्चा झालेली आहे. मागील नागपूर अधिवेशनामध्ये देखील या विषयावर चर्चा झाली होती. या चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देताना शासनाची भूमिका स्पष्ट केली होती. देशामध्ये जे नवीन अणुऊर्जा प्रकल्प होऊ घातलेले आहेत त्या संदर्भात देशाचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग यांनी देखील केंद्र शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून अनेक शंका कुशंका उपस्थित करण्यात आल्या. या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, ते या पूर्वी देखील उपस्थित करण्यात आले होते. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, काही जणांना जैतापूरला विरोध करावाच लागणार आहे. त्यांची अडचण मी समजू शकतो. त्यांनी या प्रकल्पाला विरोध केला नाही तर त्यांना जाब द्यावा लागेल, हा जाब कोणाला द्यावा लागतो, कुठे द्यावा लागतो हे आपणा सर्वांनाच माहीत आहे.

सभापती महोदय, आपण हे वर्ष विधिमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. अमृत महोत्सवाचा कार्यक्रम जुलै महिन्यात होणार होता, परंतु काही घटना घडल्यामुळे हा कार्यक्रम आता ऑक्टोबर महिन्यात घेत आहोत. विधिमंडळाला 75 वर्षे पूर्ण होत आहेत, तर राज्य स्थापनेला 50 वर्षे पूर्ण होत आहेत. असे असताना आपण किती दिवस विकासाच्या प्रश्ना मध्ये राजकारण आणावयाचे ? कोयना धरण होत असताना सुध्दा सुरुवातीच्या काळात अशाच प्रकारची चर्चा केली होती. कोयना धरणातील पाण्यापासून वीज तयार केल्या नंतर त्या पाण्यामध्ये जीव राहत नाही आणि ते पाणी शेतीला दिल्यास त्यातून काही उत्पन्न मिळणार नाही अशा प्रकारचा एक गैरसमज त्या वेळी पसरविण्यात आला होता. आज आपणा सर्वांना माहिती आहे की, आपल्या "पीक अवर" मध्ये वीज देण्यामध्ये कोयना धरणाचा किती उपयोग होतो. त्यानंतरच्या काळात काही वेगवेगळ्या प्रकारचे प्रकल्प आले. त्यामध्येही राजकारण करण्याचा प्रयत्न केला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी कोकणात एन्रॉन प्रकल्प आणताना कोकणवासीयांना एकत्र आणले होते. तसेच त्यांनी राज्याला फलोत्पादन योजना दिली. या फलोत्पादन योजनेचा फायदा कोकणाला देखील झाला. एन्रॉन प्रकल्पाला सुध्दा अशाच प्रकारचा विरोध झाला होता. या प्रकल्पाला विरोध करताना सांगण्यात आले होते की, विनाशाकडे नेणारा हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प अरबी समुद्रामध्ये बुडविला पाहिजे. त्यानंतर काय झाले हे आपणा सर्वांना माहीत आहे. ज्यांनी या प्रकल्पाला विरोध केला होता, ते सत्तेवर आल्यानंतर त्यांनीच एन्रॉन प्रकल्प पुन्हा सुरु केला. या प्रकल्पामुळे आंबा, काजू, नारळ आदीं बागांवर काही परिणाम झाला काय ? उलट आज दाभोळ येथील रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्टमधून आपणास 2200 मेगावॅट वीज उपलब्ध होत आहे.

सभापती महोदय, जैतापूर येथे होऊ घातलेला अणुऊर्जा प्रकल्प हा देशातील पहिलाच प्रकल्प आहे असे नाही. आज देशपातळीवर वेगवेगळ्या प्रकारचे प्रकल्प सुरु आहेत. सुरुवातीला भारतीय जनता पक्षाने या प्रकल्पाला पाठिंबा देताना सांगितले होते की, या प्रकल्पामुळे बाधित झालेल्यांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन व्हावे, त्यांच्या शंकांचे चांगले निरसन करावे. तेथील लोकांना विश्वासात घ्यावे. या प्रकल्पाला काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप आणि मनसे या पक्षांचा पाठिंबा आहे. या प्रकल्पाला फक्त शिवसेना पक्षाचा विरोध आहे. या प्रकल्पाला विरोध करताना त्या बाबत खोलवर अभ्यास केला आहे काय, त्या संदर्भातील माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे काय ? मी या चर्चेच्या माध्यमातून राज्यातील जनतेला एक गोष्ट स्पष्टपणे सांगू इच्छितो की, भारत सरकारने अणुऊर्जेचे अनेक प्रकल्प मंजूर केलेले आहेत. हरियाणा राज्यामध्ये 700 मेगावॅटचे चार युनिटस होणार आहेत, मध्य प्रदेशमध्ये भारतीय जनता पक्षाचे राज्य आहे तेथे 720 मेगावॅटचे दोन युनिटस होणार आहेत. गुजरात राज्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे तेथे एक हजार मेगावॅटचे सहा युनिटस होणार आहेत. पश्चिम बंगालमधील हरिपूर येथे एक हजार मेगावॅटचे सहा युनिटस होणार आहेत. आंध्र प्रदेशातील कोवाडा येथे एक हजार मेगावॅटचे सहा युनिटस होणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

आहेत. तामिळनाडू राज्यातील उदमपूरम येथे एक हजार मेगावॅटचे सहा युनिटस होणार आहेत. आपल्या महाराष्ट्रामध्ये जैतापूर येथे सोळाशे मेगॉवटचे सहा युनिटस होणार आहेत. आम्ही चुकीचे काम करीत आहोत, जैतापूर येथे आरोग्यासाठी घातक परिस्थिती निर्माण करीत आहोत असे विरोधकांना वाटत असेल तर अन्य राज्यांमध्ये जे प्रकल्प होऊ घातले आहेत ते सुध्दा चुकीचे काम करीत आहेत काय ? हरियाणा, मध्य प्रदेश, गुजरात, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांच्या मुख्यमंत्री महोदयांनी काही अभ्यास केला नसेल काय, खोलात जाऊन माहिती घेतली नसेल काय, याचा देखील आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सांगितले की, जुन्या प्रकल्पाच्या ठिकाणी अतिरिक्त वीज निर्मिती करण्याचा प्रयत्न करावा. मी सभागृहाच्या एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, जुन्या प्रकल्पाच्या नुतनीकरणाचे काम सुरु आहेच, परंतु कधी ना कधी आपल्या देशातील आणि जगातील कोळसा संपणार आहे याचा देखील विचार केला पाहिजे. राज्यकर्त्यांनी नेहमीच पुढील 25-50 वर्षे डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतले पाहिजेत. आपल्याकडे पाण्यापासून वीज निर्मिती करण्याचे प्रकल्प आहेत. परंतु आपण पाण्याचे वाटप करताना प्रथम पिण्यासाठी नंतर शेतीसाठी आणि शेवटी उद्योग असा क्रम दिलेला आहे. मागील दोन दिवसांपूर्वी म्हणज् दिनांक 9 ऑगस्ट रोजी मावळ येथे पाण्यावरुन काय घडले हे संपूर्ण देशाने आणि राज्याने पाहिलेले आहे. म्हणजे पाण्यासाठी युध्द होतील अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आपणास पाण्यापासून जास्त वीज तयार करता येत नाही. आपण वाऱ्यापासून वीज तयार करतो पण त्याच्या साईटस् मर्यादित आहेत. कोळशा पासून वीज तयार करतो पण त्यासाठी पर्यावरणाच्या निकषा प्रमाणे काम करावे लागते. आपणास काही ठिकाणी कोळशाच्या खाणी मंजूर झाल्या परंतु त्या संदर्भात पर्यावरण विभागाने आणि सर्वोच्च न्यायालयाने नवीन भूमिका स्वीकारल्यामुळे तेथे खाणी घेता आल्या नाहीत. आज आपण परदेशातून कोळसा आयात करतो. परंतु परदेशातील कोळसा कधी ना कधी संपणार आहे ही बाब देखील आपण लक्षात घेतली पाहिजे. साखर कारखान्यातून

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

वीज निर्मिती करीत आहोत. त्यासाठी आपण साखर कारखान्यांना सवलती देत आहोत. त्या शिवाय धुळे जिल्ह्यातील साक्री येथे सूर्याच्या उष्णतेपासून 125 मेगावॅट वीज निर्मिताचा प्रकल्प घेतलेला आहे. परंतु त्यामध्ये काही अडचणी आलेल्या आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न सुरु आहे. म्हणजे आम्ही फक्त अणुऊर्जा प्रकल्पावरच भर दिलेला आहे असा कोणाला दावा करता येणार नाही ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, आपण अणुऊर्जा प्रकल्प प्रथमच करीत आहोत असे नाही. या संदर्भात माझ्याकडे काही माहिती आहे. तारापूर येथे चार अणुभट्टया सुरु आहेत. राजस्थानमध्ये सहा अणुभट्टया सुरु आहेत. तामिळनाडू राज्यामध्ये 1984-1986 पासून 2 अणुभट्टया सुरु आहेत. राजस्थानमधील अणुभट्टया 1973 पासून सुरु आहेत.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

महाराष्ट्रामध्ये 1969 सालापासून सुरु आहेत, कर्नाटकमध्ये 2000 सालापासून सुरु आहेत, गुजरातमध्ये 1993 पासून अणुभट्टया सुरु आहेत. अशाप्रकारे संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक या राज्यांमध्ये 18 अणुभट्टया सुरु आहेत. त्यामधून 4780 मेगावॅट इतकी वीज निर्मिती होत आहे. याचा अर्थ या राज्यांमध्ये 1983 सालापासून अणुभट्टया सुरु आहेत आणि आपण 2011 सालामध्ये आहोत. जगातील वेगवेगळया देशांशी तुलना केली तर अमेरिका, फ्रान्स, जपानमध्ये मोठया प्रमाणावर अणुभट्टया सुरु आहेत. त्यामध्ये चीन देशामध्ये आज 13 अणुभट्टया असून आणखी 45 अणुभट्टयांची उभारणी करण्याचे काम सुरु आहे. सभापती महोदय, आपण एकीकडे म्हणावयाचे की, चायना आपल्यामागून पुढे चालले असतांना आपण कां मागे राहात आहोत?

**(सभापतीस्थानी सन्माननीय उप सभापती)**

अशावेळी विकासाचे प्रश्न येतात, गरिबातल्या गरीब माणसापासून ते श्रीमंतातल्या श्रीमंत माणसापैकी प्रत्येकाला आज वीज लागत आहे आणि उद्या देखील लागणार आहे. अशा वेळी आपण दुर्दैवाने वेगळया पध्दतीचे राजकारण करण्याचा प्रयत्न करीत आहोत हे आपल्याला शोभा देणारे नाही. सभापती महोदय, आज अमेरिका एकूण वीज निर्मितीच्या 20 टक्के वीज निर्मिती अणुऊर्जेपासून करीत असून जगामध्ये महासत्ता म्हणून गणली जात आहे. त्याचप्रमाणे फ्रान्समध्ये 75 टक्के, जपानमध्ये 29 टक्के, रशियामध्ये 18 टक्के, कॅनडामध्ये त्यांच्या एकूण वीज निर्मितीच्या 15 टक्के, जर्मनीमध्ये 29 टक्के, युक्रेनमध्ये 49 टक्के, चायनामध्ये 3 टक्के आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर अणुऊर्जेपासून वीज निर्मिती करण्यासाठी अणुभट्टया उभारण्याचे काम सुरु आहे. आपण आपल्या भारत देशामध्ये 2.5 म्हणजे अडीच टक्के देखील अणुपासून वीज निर्मिती करु शकलो नाही ही परिस्थिती आहे. त्यामुळे हे प्रकल्प झाले पाहिजेत या करिता केंद्र सरकारने ही भूमिका मनावर घेतली आहे.

सभापती महोदय, डिसेंबर महिन्यामध्ये सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यवस्थितपणे संपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न केला होता. खरे तर जैतापूरच्या प्रकल्पाला काही लोकांचा असलेला विरोध सोडला तर हा प्रकल्प व्यवस्थित मार्गी लागला होता. परंतु त्याच वेळी जपानमध्ये झालेल्या भूकंपामुळे आणि तेथील अणुभट्टयांमध्ये झालेल्या स्फोटामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प असुरक्षित आहे, अशाप्रकारची चर्चा सुरु झाली. सभापती महोदय, दिनांक 11.3.2011 रोजी फुकुशिमाला मोठा भूकंप झाला. त्याची तीव्रता 8.9 रिश्टर स्केल एवढी होती. त्यावेळी फुकुशिमा येथे 6 अणुभट्टयांपैकी 4 अणुभट्टया सुरु होत्या आणि 2 अणुभट्टया बंद होत्या. भूकंपाची नोंद झाल्यानंतर या चारही अणुभट्टया आपोआप बंद झाल्या. बाह्य विद्युत पुरवठा बंद पडल्यामुळे तेथील अणुभट्टी थंड ठेवण्याचे काम सुरु करण्यात आले. भूकंप झाल्यानंतर 50 मिनिटांनी त्सुनामीची मोठी लाट आली. त्या लाटेमुळे सुरु करण्यात आलेली सर्व जनरेटर संयंत्रे बंद पडली. त्यामुळे अणुभट्टी थंड करण्याचे कार्य बंद झाले. सभापती महोदय, त्सुनामीची लाट 50 मिनिटांनी आल्यानंतर हे सर्व घडले आहे. तोपर्यंत अतिशय चांगल्या प्रकारची टेक्नॉलॉजी वापरुन त्यांनी त्या ठिकाणी काम सुरु केले होते. कोणत्याही प्रकारे विद्युत पुरवठा सुरु नसल्यामुळे अणुभट्टया थंड करण्याचे कार्य बंद पडले. त्या मुळे अणुभट्टीमधील दाब व तापमान वाढत गेले, त्यामध्ये हायड्रोजन वायूची निर्मिती होऊन तो वायू बाहेर ऑक्सिजनच्या संपर्कात आल्यानंतर हायड्रोजनचे स्फोट घडून आले.

सभापती महोदय, जगाची निर्मिती झाल्यानंतर आपण अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा वापर करुन इथपर्यंत पोहोचलो आहोत. असे असतांना एखादी दुर्दैवी घटना घडली म्हणून कोणतीही गोष्ट करावयाची नाही हे त्याचे उत्तर नाही. घडलेली दुर्दैवी घटना कोणत्या कारणांनी घडली याच्या खोलात जावून तिची पुनरावृत्ती होणार नाही याकरिता संपूर्ण नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन उपाय योजना करावयाची असते. त्यामध्ये इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी असेल, बायोटेक्नॉलॉजी असेल इत्यादी जे जे नवीन संशोधन घडत असेल त्या सर्व बाबींचा विचार करावयाचा असतो. हे आज पर्यंत त्या ठिकाणी घडत आले आहे ही वस्तुस्थिती आपण सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. हाच मुद्दा सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, संजय केळकर व डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केला होता. भारताजवळील समुद्रामध्ये एवढा मोठा भूकंप घडू शकेल अशाप्रकारचा भू दोष या ठिकाणी नाही हे सिध्द झाले आहे. अशाप्रकारची परिस्थिती भारतामध्ये उद्‌भवण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. त्याची कारणे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देवू इच्छितो. त्सुनामी येण्यासाठी समुद्रामध्ये मोठा भूकंप होण्याची आवश्यकता असते. भारताजवळील समुद्रामध्ये भू दोष

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

हे पूर्व किनाऱ्यावर सुमात्राजवळ आणि पश्चिम किनाऱ्यावर मकरान येथे आहेत. जैतापूर हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. मकरानचा भू दोष मुंबईपासून 900 कि.मी. अंतरावर आहे. येथे असलेल्या भू दोषामुळे भूकंप झाल्यास जी त्सुनामी निर्माण होईल ती जैतापूरपर्यंत पोहोचण्यास अडीच तास लागतील. त्याचप्रमाणे जैतापूर येथील त्सुनामी लाटेची अपेक्षित कमाल उंची 3 मीटर एवढीच आहे आणि जैतापूर हे समुद्र पातळीपासून सरासरी 24 मीटर उंचीवर आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप व कोकणातील अन्य सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या कातळ जमिनीवर हा प्रकल्प उभा राहणार आहे तो समुद्र पातळीपासून सरासरी 24 मीटर उंचीवर आहे. त्या ठिकाणी अणुभट्ट्या उभारतांना त्या योग्य पध्दतीने म्हणजे 10 मीटर उंचीवर ठेवण्यात येणार असल्यामुळे त्या ठिकाणी त्सुनामीचा कोणताही धोका उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, यापूर्वी अशाप्रकारची एक त्सुनामीची लाट आली होती, त्यावेळी मुंबईमध्ये सुध्दा लाट येऊन त्यामुळे मुंबई वाहून जाईल अशी भीती काही लोक व्यक्त करीत होते. तशा प्रकारची चर्चा झाल्यामुळे आपण मुंबई सोडली काय, मुंबईमध्ये राहावयाचे आपण बंद केले काय? सभापती महोदय, ज्यावेळी एखादी गोष्ट दहा ते पंधरा वेळा गोबेल्स नीतिचा वापर करुन सांगितली जाते त्यावेळी खरी गोष्ट देखील खोटी वाटावयास लागते. त्यावेळी या देशातील काही राज्यांनी सुध्दा अशा प्रकारचा अनुभव घेतला आहे. काही लोकांनी या संदर्भात्‌ील आपली मते व्यक्त केली. मी या बाबत सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही राजकीय कार्यकर्ते असून जरुर सरकार चालवित आहोत. त्यामुळे आमच्याजवळ त्या संदर्भातील तांत्रिक ज्ञान कमी आहे. अशावेळी या क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांकडून आम्ही माहिती घेतो. प्रत्येक क्षेत्रामध्ये वेगवेगळया प्रकारची तज्ज्ञ माणसे असतात. त्यांच्याकडून ती माहिती गोळा करावयाची असते व त्यामधून आपण आपले मत पक्के करावयाचे असते. सभापती महोदय, या देशाचे अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. श्रीकुमार बॅनर्जी यांनी देखील जैतापूरला विरोध कशासाठी करीत आहात असा प्रश्न विचारला आहे? आज ते आपल्या अणुऊर्जा आयोगाचे प्रमुख आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत साहेब म्हणाले की, तुम्ही लोकांच्या शंकेचे निरसन कां करीत नाही? सभापती महोदय, आपण या सभागृहामध्ये डॉ. काकोडकर यांचे एक व्याख्यान या विषयावरील त्यांचे विचार सभागृहातील सर्व सन्माननीय

श्री. अजित पवार ....

सदस्यांना ऐकण्याकरिता एक व्याख्यान ठेवले होते. माझ्या माहितीप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये देखील त्याबाबत एक चर्चा घडवून आणली आहे. त्याच संदर्भात जैतापूर परिसरातील कोकणवासियांच्या शंकेचे निरसन करण्याकरिता वेगवेगळया प्रकारच्या टीम आपण बनविल्या. देशाची 40 टक्के जनता अंधारात असतांना आणि ऊर्जा टंचाईचे भीषण संकट देशासमोर उभे ठाकले असतांना जैतापूर हवा की नको हा प्रश्न नसून तुम्हाला विकासाची कास धरावयाची आहे की, त्याकडे पाठ फिरवायची आहे हा खरा प्रश्न आहे. या शब्दामध्ये अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. श्रीकुमार बॅनर्जी यांनी जैतापूरच्या प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्पाचे समर्थन केले आहे. आज ते मोठया पदावर पोहोचले असून त्यांचा या क्षेत्रामध्ये दांडगा अनुभव आहे म्हणून ते अशा पध्दतीने विचारीत आहेत.

समुद्र किनारा जवळ असतांना देखील जैतापूरच्या प्रकल्पासाठी निश्चित केलेली जागा ठराविक उंचीवर असल्यामुळे भूकंपाचा किंवा त्सुनामीचा थेट फटका या प्रकल्पाला बसणार नाही हे जैतापूरचे वैशिष्टय आहे. या शिवाय प्रत्येक प्रकल्पाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार तेथील रिॲक्टर बनविले जातात. म्हणूनच आता प्रकल्पास मान्यता मिळाल्यावर त्याच्या जागेमध्ये बदल करणे योग्य होणार नाही. असे म्हणत त्यांनी प्रकल्पास आपली संमती दर्शविली. डीआरडीओ मध्ये नव्याने दाखल झालेल्या तरुण शास्त्रज्ञांचे सेवापूर्व प्रशिक्षण ज्याला आपण फंडस प्रोग्राम म्हणतो त्याकरिता खडकवासला येथे असलेल्या डिफेन्स इंन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी म्हणजेच डीआयएटीचे उद्घाटन डॉ. बॅनर्जी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. डीआयएटीचे कुलगुरु प्रा. एल.एम.पटनाईक हे देखील तिथे उपस्थित होते. जैतापूरला होत असलेल्या स्थानिकांच्या तीव्र विरोधामुळे या प्रकल्पाची जागा अन्यत्र हलविणे शक्य आहे काय? यावर ते म्हणाले की, कोणत्याही अणु प्रकल्पासाठी जागा निश्चित करण्यामागे कित्येक वर्षाची प्रदीर्घ अशी तांत्रिक प्रक्रिया असते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

हा काही एका दिवसाचा खेळ नसतो. ठीक आहे, काहीजण नाही म्हणत आहेत म्हणून तेथून हा प्रकल्प उचलून तिसरीकडें नेण्यात यावा असे सांगितले जात आहे. त्यामध्ये प्रदीर्घ अशी कित्येक वर्षाची तांत्रिक प्रक्रिया आहे.तसेच जैतापूरच्या प्रकल्पाला संमती देण्यापूर्वीच सर्वंकष अभ्यास झाला म्हणूनच आता जागेमध्ये बदल करणे योग्य होणार नाही. ही गोष्ट सुध्दा या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील जनतेने आणि विशेषत: ज्यांचा विरोध आहे, त्यांनी समजून घेतली पाहिजे. जपानमध्ये झालेल्या भीषण भूकंपामध्ये आणि त्यानंतर झालेल्या त्सुनामी तडाख्यात 25 हजार नागरिकांनी प्राण गमावले असले तरी या संकटाची व्याप्ती जाणीवपूर्वक बाजूला ठेवत फुकोशिमा येथील अणु प्रकल्पात झालेल्या दुर्घटनेला विनाकारण मोठे केले जाते असा प्रतिवाद करुन फुकोशिमाची तुलना अन्य प्रकल्पाशी करणे योग्य नसल्याचा दावा डॉ.बॅनर्जी यांनी केला.फुकोशिमा प्रकल्पातून किरणोत्सर्ग झाला असला तरी या प्रकल्पातून फिक्शन प्रक्रिया न झाल्यामुळे आजवर एकही जीवीतहानी झालेली नाही.म्हणूनच फिकोशिमा दुर्घटनेची तुलना चेर्नोबिल किंवा हिरोशिमाशी करणे योग्य ठरणार नाही अशा पध्दतीने सांगण्यात आले आहे. आता अणूऊर्जेबाबत सकारात्मक विचार करावा असे डॉ.काकोडकर यांनी देखील सांगितले आहे.

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्प झालाच पाहिजे असे श्री.राज ठाकरे यांनी देखील मधल्या काळामध्ये स्टेटमेंट केले होते. परंतु काहीजण मात्र जैतापूर प्रकल्प होता कामा नये, सदर प्रकल्प दुसऱ्या राज्यामध्ये हलविण्यात यावा असे सांगत आहेत. आपण वीज विकत घेऊ असे एका पक्षाच्या नेत्यांनी सांगितले, म्हणजे हा प्रकल्प दुसऱ्या राज्यात हलवून त्यांचे वाटोळे करा. जर आपल्याकडे नुकसान होत असेल तर त्या पक्षाच्या नेतृत्वाने असे म्हणावयास नको. जर तो प्रकल्प विनाशकारी होत असेल तर मग संपूर्ण देशामध्येच होता कामा नये. दुसऱ्या राज्यामध्ये म्हणजे कुठे ? तर गुजराथ, मध्य प्रदेश किंवा राजस्थानमध्ये हलवावयाचा काय ? आपण लोकांना कोणती नीती शिकवित आहोत? याचाही विचार केला पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, त्याठिकाणी जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाची शास्त्रीय बैठक देखील आहे. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भूगर्भ शास्त्रज्ञ श्री.एम.के.प्रभू यांनी जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्प अशास्त्रीय कसोट्यांवर आधारित असल्याचे वक्तव्य केले. ठीक आहे.पाचही बोटे सारखी नसतात. सगळेच काही आपल्याला समर्थन करणारे आहेत असा आम्ही दावा करीत नाही.त्यामुळे श्री.एम.के.

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

प्रभू या शास्त्रज्ञांनी त्यांचे वक्तव्य केले. जगभरातील अणूऊर्जा प्रकल्प तिथल्या भूकंपाच्या स्थितीला यशस्वी तोंड देऊन उभे रहातील अशा पध्दतीने त्याचे डिझाईन केले जाते.जैतापूर हे तीन क्रमांकाच्या भूकंप प्रवण क्षेत्रामध्ये येते हे सन्माननीय सदस्य श्री.रामदासजी कदम साहेबांनी लक्षात धेतले पाहिजे.जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया त्याचप्रमाणे एन.जी.आर.आय., हैद्राबाद यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार प्रकल्प स्थळापासून 39 कि.मी.अंतरावर कोणताही क्रियाशील भूदोष नाही. त्याठिकाणचा गेल्या 300 वर्षातील भूकंपाचा इतिहास आणि तेथील भूकंप प्रवणता लक्षात घेऊन अणूऊर्जा प्रकल्पाचे डिझाईन केलेले आहे. आंतरराष्ट्रीय मानकानुसार येत्या 100 वर्षात तेथे जास्तीतजास्त किती तीव्रतेचा भूकंप येईल याचे भाकीत विचारात घेऊन प्रकल्पाच्या इमारतीचे बांधकाम, त्याचप्रमाणे विविध यंत्रसामुग्रीच्या पायाचे बांधकाम करुन यंत्रसामुग्री उभारली जाते. अणुऊर्जा प्रकल्पाची समतल पातळी ही तेथे पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, जवळ नदी असल्यास नदीला येणारा सर्वात मोठा पूर, समुद्राजवळ असल्यास भरती आणि त्सुनामीच्या लाटेची ऊंची या सर्वांचा विचार करुन ठरविली जाते. सर्वात जवळचा समुद्र तळातील क्रियाशील भूदोष हा सुमारे 900 कि.मी.अंतरावर मक्रान येथे आहे आणि मक्रान भूदोषाची भूकंप तीव्रता आणि त्यातून निर्माण होणारी त्सुनामी ही जेव्हा जैतापूरच्या तटावर पोहोचेल, तेव्हा या लाटेची ऊंची जास्तीतजास्त 3 मीटर असेल. त्यामुळे ही लाट जैतापूरपर्यंत पोहोचण्यास किमान अडीच तासाचा कालावधी लागेल आणि मी मघाशीच सांगितल्याप्रमाणे जैतापूरचे पठार 24 मीटर ऊंचीवर आहे. तसेच प्रकल्पातील वाफ थंड करण्यासाठी समुद्रातून पाणी येईल आणि सर्वच्या सर्व सहा युनिट कार्यरत झाल्यानंतर हवामानाच्या सर्वात कठीण परिस्थितीत समुद्रात सोडल्या जाणाऱ्या पाण्याच्या तापमानातील वाढ ही कदमसाहेब, 5 अंश सेंटीग्रेट असेल आणि हे पाणी समुद्राच्या तळाला सुमारे 100 फूट बोगदा खणून दूर समुद्रामध्ये सुमारे दीड ते अडीच कि.मी.अंतरावर सोडले जाईल.

सभापती महोदय,मघाशी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर किंवा डॉ.दीपक सावंत साहेब म्हणाले की,त्याला गंज पकडेल, त्याला असेच होईल,. तसेच होईल.पण असे कुठे चालते काय? आज आपण एवढे फ्लाय-ओव्हर केले.त्यावेळी तेथे गंज पकडणार नाही अशा प्रकारचे देखील स्टील वापरता येते की नाही.आज गॅसच्या कितीतरी पाईपलाईन समुद्रातून जात आहेत की नाहीत? आज वेगवेगळया देशातून,जगातून पाईप लाईन जात असतील.परंतु गंजच पकडेल एवढेच जर डोक्यामध्ये घेतले तर ते बरोबर नाही.आता यामध्ये कितीतरी सुधारणा झालेल्या आहेत.त्यामुळे

. . . .एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . ..

याबाबत कीव करावीशी वाटते.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे भाषण सुरु असताना त्यांना अजिबात डिस्टर्ब केले नव्हते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबतीत जो रिपोर्ट आहे, ते मी सांगितले आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या बोगद्यामुळे मच्छीमारांच्या बोटींना कोणत्याही प्रकारचा अटकाव होणार नाही.आपण समुद्रामध्ये दीड ते अडीच कि.मी. बोगदा खणत आहोत, त्यामुळे अटकाव होणार नाही.समुद्री जलजीवनावर कोणत्याही प्रकारचा विपरित परिणाम होणार नाही आणि मी नागपूर येथे माननीय मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य ऐकले होते आणि याठिकाणी स्वत: माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत.त्यावेळी ते असे म्हणाले होते की, थोडेसे पाणी गरम झाल्यावर मासे जास्त चांगल्या प्रकारे वाढतात असे संशोधन झालेले आहे.

श्री.रामदास कदम (खाली बसून) : तुमचाकडे अहवाल दिलेला आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.अजित पवार : सभापती महोदय,पाण्याच्या तपमानातील वाढीचा जल जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास बी.आर.एल.एस.ने आठ विद्यापीठांच्या सहाय्याने मद्रास जवळील "कल्पकम" येथे आणि "कैगा" येथे केला.सभापती महोदय,आणखी काय केले पाहिजे. त्या अहवाला नुसारच पाण्यातील तपमान वाढीचा जल जीवनावर कोणताही परिणाम होणार नाही असे सिध्द झाले आहे. अशाच प्रकारचा आणखी एक अभ्यास सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ फिशरीज्, मुंबई यांनी "कैगा" येथे केला आणि त्यांच्या अहवालानुसारही त्याठिकाणी ते सिध्द झालेले आहे.जैतापूर येथे प्रस्तावित असलेली फ्रान्सची ईपीआर प्रकारची अणुभट्टी ही अत्यंत अद्ययावत सुरक्षा यंत्रणा असणारी अणुभट्टी आहे. मला आठवते की, ज्यावेळी जपान येथे घटना घडली, त्यानंतर देशाच्या माननीय पंतप्रधान यांनी जाणीवपूर्वक या क्षेत्रातील वरिष्ठांना सूचना दिल्या की, या सगळया बाबतीत प्रुफ अशा प्रकारच्या अणुभट्टया तुमच्या-माझ्या देशामध्ये उभ्या राहिल्या पाहिजेत आणि आजच्या काळानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व सुरक्षा यंत्रणा, त्याचबरोबर प्रवासी वाहतूक करणारे विमान जरी अणुभट्टीवर आदळले तरी ती अणुभट्टी पूर्णपणे सुरक्षित राहील असे याचे डिझाईन केले. सप्टेंबर

. . . .एन-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

महिन्यामध्ये अमेरिकेमध्ये जे घडले, तसे एखाद्या वेळेस दुर्दैवाने पाकिस्तानच्या मनात आले आणि त्यांनी तेथे विमान आदळण्याचा प्रयत्न केला तरी देखील त्या अणुभट्टीला काही होणार नाही अशा प्रकारची व्यवस्था करुन सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेत आहोत आणि तशा प्रकारचे डिझाईन केलेले आहे.अजुबाजूची शेती, फळबागा, पर्यावरण्, जलसाठे त्याचप्रमाणे मनुष्य आणि मानवी जीवनावर तसेच समुद्र जलजीवनावर कोणताही विपरित परिणाम होणार नाही या गोष्टी देखील आपण लक्षात धेतल्या पाहिजेत. भारतामध्ये विविध ठिकाणी 20 अणूभट्टया कार्यरत आहेत आणि या अणुभट्ट्यांच्या आसपासच्या परिसरात इ.एस.एल.या त्रयस्थ संस्थेव्दारे वातावरणातील अन्य पदार्थातील, मातीतील, पिकातील, पाण्यातील किरणोत्साराच्या प्रमाणात सतत अभ्यास केला जातो. अशा वेळी किरणोत्साराचे प्रमाण नैसर्गिक पातळीपेक्षा वाढत नाही ना याकडे सतत लक्ष ठेवले जाते हे येथे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेब, आपण लक्षात घ्यावे. अणुऊर्जा प्रकल्पामध्ये काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये स्त्रियांचा देखील समावेश आहे. हे कर्मचारी किंवा स्त्रिया व त्यांच्या भावी पिढीच्या आरोग्यावर कोणताही विपरित परिणाम होत नाही तथा तसा झालेला आढळून येत नाही ही गोष्ट देखील समोर आलेली आहे. मला एक गोष्ट सांगावयाची आहे की,काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की,आमच्या रामदास कदम साहेब यांनीच सांगितले की,जैतापूरच्या प्रकल्पातून 27 टन कचरा निघेल म्हणजे हा कचरा वर्षामध्ये निघेल, महिन्याभरामध्ये निघेल की संपूर्ण 50 वर्षामध्ये निधेल कोणाला माहिती.

श्री.रामदास कदम : वर्षाला.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ठीक आहे, वर्षाला निघेल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा माझा अहवाल नाही तर नीरी चा अहवाल आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे वर्षाला 27 टन कचरा निघेल. मला राज्यातील सर्वांनाच या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे की, अणुभट्टीतून निघणारे इंधन हा अणू कचरा नसतो हे मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो. त्या इंधनावर पुन्हा प्रक्रिया करुन नवीन इंधन तयार केले जाते.यामध्ये एक टन इतका कचरा निघतो हे मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब यांना सांगू इच्छितो आणि कचरा म्हणजे काय, तर तेथे जे कर्मचारी काम करतात त्यांचे कपडे,त्यांचे लॅब कोट आणि उपकरणे यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी वेस्ट मॅनेजमेंट प्लान्ट हा प्रत्येक अणू ऊर्जा प्रकल्पाच्या ठिकाणी असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

ही गोष्ट देखील आपण लक्षात घेतली पाहिजे. मघाशी मी सांगितले की, समुद्राचे पाणी 5 अंश सेंटिग्रेड पर्यंतच गरम होणार आहे. त्यामुळे त्या ठिकाणी त्याचा कोणताही धोका नाही. मी सांगितले की, जैतापूरचा प्रकल्प झोन 3 मध्ये आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी याबाबत सांगितले. आपण कोणता नकाशा आणलेला आहे, माहीत नाही. त्यांनी सांगितले की, जैतापूर झोन 4 मध्ये आहे...

श्री. रामदास कदम : हा शासनाचाच नकाशा आहे. असत्य बोल पण रेटून बोल ही अपेक्षा माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्याकडून नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, जैतापूरचा प्रकल्प हा झोन 3 मध्ये येतो. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, स्थानिक लोकांना नोकरी व कॉन्ट्रॅक्ट द्या. स्थनिकांना प्रशिक्षण, नोकऱ्या आणि त्यांच्या सहकारी संस्थांना कॉन्ट्रॅक्ट देण्याबद्दल पुनर्वसन पॅकेजमध्ये निश्चितपणे विचार केला जाईल. त्याबद्दल काळजी करण्याचे काहीच कारण नाही. मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, यामध्ये केंद्र सरकार 1 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे आणि राज्य सरकारचा या वर्षीचा प्लॅन 42 हजार कोटी रुपयांचा आहे. नॉन प्लॅन खर्च वेगळा आहे पण प्लॅन खर्च 42 हजार कोटी रुपयांचा आहे. आज 1 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन त्या ठिकाणी 10 हजार मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. हे करीत असताना इतर जी प्रगत राज्ये आहेत, आपण नेहमी गुजरातचे नाव घेता पण त्या ठिकाणी सुध्दा असे प्रकल्प आहेत. तेथील विरोधक काँग्रेस पक्षाचे आहेत आणि ते समन्वयाची भूमिका घेतात, त्यामध्ये सहकार्य करतात. मध्य प्रदेशमध्ये देखील कॉग्रेस विरोधी पक्षात आहे. त्या ठिकाणी सुध्दा कॉग्रेस प्रकल्प झाले पाहिजे म्हणून सहकार्य करते. आम्ही त्या ठिकाणी विरोधाला विरोध करीत नाही. आम्ही असत्य रेटून बोलत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांचे उत्तर संपल्यानंतर आपल्याला जे काही विचारावयाचे असेल ते विचारु शकता. सन्माननीय सदस्यांनी कृपया मध्ये बोलू नये.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या ठिकाणी चुकीचे रेकॉर्डवर येत आहे.

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांचे उत्तर संपल्यानंतर आपल्याला जे आक्षेपार्ह वाटत असेल ते मला सांगावे, मी ते रेकॉर्डवरुन काढावयास सांगतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांचे भाषण पूर्ण होऊ द्या.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पर्यावरण विषयक मंजुरी देताना देखील पर्यावरण विभागाने ज्या एकूण 35 अटी घातलेल्या आहेत त्यातील 12 अटी सर्वसाधारण असून 23 अटी जैतापूर प्रकल्पाशी निगडित आहेत. त्यातील ज्या मुख्य अटी आहेत त्यामध्ये मुंबई नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या मदतीने जैव विविधता संधारण आराखडा तयार करण्यात यावा, बाहेरील त्रयस्थ तज्ज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करुन पर्यावरण विषयक मंजुरी मिळविताना पर्यावरण व्यवस्थापनाशी निगडित ज्या बाबी करण्याचे मान्य करण्यात आले आहे त्या बाबींची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचे काम समितीकडे सोपविणे, अणुऊर्जा नियामक मंडळाच्या विविध मान्यता घेणे, 2019 मध्ये युनिट 1 आणि 2 कार्यान्वित झाल्यानंतर पुन्हा एन्व्हायर्नमेंट इम्पॅक्ट ॲसेसमेंट करणे या सगळ्या बाबी त्यामध्ये पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून घेतलेल्या आहेत.

सभापती महोदय, भूसंपादनाच्या बाबतीत काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यांनी कोयनेचे उदाहरण दिले. मागच्या काळामध्ये जे प्रकल्प झाले त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांचे जे नीटनेटके पुनर्वसन व्हावयास पाहिजे होते ते सुरुवातीच्या काळामध्ये झाले नाही, हे आम्ही देखील मान्य करतो. त्यानंतर केंद्र शासनाने देखील यामध्ये लक्ष घातले. देश पातळीवर येणाऱ्या वेगवेगळ्या प्रकल्पांच्या संदर्भामध्ये केंद्र शासनाने पुनर्वसनाचे नवीन धोरण स्वीकारले. आमच्याही राज्यामध्ये मदत व पुनर्वसन खात्याचे मंत्री या नात्याने प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने ज्या काही फायद्याच्या बाबी आहेत त्या करण्याचे राज्याच्या पुनर्वसन धोरणामध्ये स्वीकारले आहे. त्यामध्ये आम्ही काही वेगळी भूमिका घेतलेली नाही. या पुढच्या काळामध्ये कोणताही प्रकल्प येत असताना त्यामध्ये आधी व्यवस्थित पुनर्वसन झाले पाहिजे अशी आमची भूमिका आहे. मागच्या काळामध्ये अंतिम निवडा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ......

झाल्यानंतर 2335 खातेदारांपैकी 177 खातेदारांनी निवाड्याची रक्कम स्वीकारलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जे सांगितले ते खरे आहे की, जे मुंबईमध्ये आहेत त्यांनी ती मदत स्वीकारलेली आहे. परंतु सुरुवातीच्या काळामध्ये जमिनीचा मोबदला अवघा 48 हजार रुपये ते 1 लाख 60 हजार रुपये प्रति एकर दराने प्रदान करण्यात आलेला आहे. त्यामध्ये आता आम्ही कितीतरी पटीने वाढ करीत आहोत. त्या लोकांचे नुकसान होऊ नये, त्या प्रकल्पग्रस्तांना पुढे कोठेही अडचण येऊ नये याकरिता ती फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे आणि माननीय मुख्यमंत्री स्वत: म्हणाले की, यामध्ये आपल्याला कोकणवासीयांना, प्रकल्पग्रस्तांना जास्तीत जास्त मोबदला द्यावयाचा आहे. त्यांचे समाधान होईल अशा पध्दतीची रक्कम आम्ही देणार आहोत. या प्रकल्पाच्या आजूबाजूच्या परिसरात होणारे सामाजिक, आर्थिक बदल याचा अभ्यास करण्यासाठी पुण्याच्या यशदा संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी कमी लोकांना नोकऱ्या लागणार आहेत. परंतु ज्यांना नोकऱ्या लागणार नाहीत त्यांच्या घरामध्ये त्यांना काही तरी स्वत:चा व्यवसाय करण्याकरिता प्रत्येकी 5 लाख रुपये बँकेत एकचतुर्थांश रक्कम भरण्याकरिता देऊन उरलेली 75 टक्के रक्कम तो बँकेकडून घेईल. म्हणजे शासनाने दिलेले 5 लाख रुपये आणि साधारणत: 75 टक्के त्यांचे अशा पध्दतीने साधारणत: 20 लाख रुपयामध्ये चांगल्या पध्दतीने व्यवसाय होऊ शकतो. त्यामुळे तशा प्रकारचा शासनाचा विचार आहे.

प्रकल्पग्रस्ताच्या कुटुंबातील एका व्यक्तीस प्रकल्पामध्ये कायमस्वरुपी नोकरी देणे, ज्याला नोकरी देता येणार नाही, शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यास त्याला कंपनीच्या खर्चाने प्रशिक्षण देणे किंवा प्रकल्पात पदे उपलब्ध नसल्यास किंवा प्रकल्पग्रस्त स्वत:हून नोकरी करीत नसल्यास त्याच्या कुटुंबास किमान 5 लाख रुपये अर्थसहाय्य द्यावयाचे आणि अप्रशिक्षित प्रकल्पग्रस्तांसाठी एक वर्षाच्या आत प्रशिक्षणाचे आयोजन करुन प्रकल्पाचे काम सुरु झाल्यापासून दोन वर्षाच्या आत प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्यावयाचे, बाधित गावांच्या नागरी सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रतिगाव रुपये 2 कोटी एवढी रक्कम प्रदान करण्यात येणार आहे. शासन एकदाच 2 कोटी रुपये देणार असे नाही तर या नागरी सुविधांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी प्रतिवर्षी 25 लाख रुपये एवढी रक्कम प्रत्येक गावास उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. अजित पवार ....

सभापती महोदय, 980 भूमिहीन प्रकल्पग्रस्तांना किमान 750 दिवसांएवढी कृषी मजुरी पुनर्वसन अनुदान म्हणून अंदाजे पाऊण लाख रुपये प्रदान करण्यात येईल तसेच अंशत: जमीन संपादित झालेल्या आणि अल्पभूधारक झालेल्या प्रकल्पग्रस्तांना अनुक्रमे 500 दिवस व 375 दिवस एवढ्या दिवसांची किमान कृषी मजुरी पुनर्वसन अनुदान म्हणून प्रदान करण्यात येईल. प्रकल्पाच्या ठिकाणी किरकोळ कामे प्रकल्पग्रस्त व्यक्तींचा समूह किंवा सहकारी संस्था यांना प्राधान्याने देण्याचे काम करणार आहोत. त्यातून तेथील स्थानिक लोकांना काम मिळेल. बाधित गावातील आश्रित, परित्यक्ता, निराधार व्यक्तींना दरमहा 500 रुपये आजीवन निवृत्तिवेतन आपण त्यांच्यातर्फे देणार आहोत. म्हणजे आपली जी संजय गांधी निराधार योजना किंवा श्रावणबाळ योजना असेल ते वेगळे आहे पण हेही आपण तेथील परित्यक्ता आणि निराधार व्यक्तींना देण्याचे धोरण त्या ठिकाणी स्वीकारलेले आहे. सध्या 3 किलोमीटर लांबीच्या प्रकल्पस्थळाच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम चालू आहे. त्यातील बरेचसे काम झालेले आहे. प्रकल्प स्थळावर मेटॅरॉलॉजिकल टॉवरची उभारणी पूर्ण करण्याचे काम सुरु आहे आणि ऑनलाईन टाटा रिसिव्हींग स्टेशन त्या ठिकाणी प्राप्त होत आहे. प्रकल्प स्थळावर प्रकल्पाचे कार्यालय, गुणवत्ता प्रमाणपत्र प्रयोगशाळा यांचे बांधकाम, कर्मचारी वसाहतीजवळ पावसाचे पाणी साठविण्याच्या तलावाचे बांधकाम आणि प्रकल्प स्थळावर समुद्राच्या बाजूने प्रिकॉस्ट संरक्षण भिंतीचे बांधकाम याच्या सर्व निविदा काढलेल्या आहेत. या ठिकाणी या चर्चेच्या निमित्ताने मला एक गोष्ट सांगावयाची आहे. केंद्र शासनाचे असे म्हणणे आहे की, देश पातळीवर ज्या ज्या राज्यामध्ये अणुऊर्जा प्रकल्प पूर्वीपासून चालत आलेले आहेत किंवा ज्या नवीन घटना जगामध्ये घडलेल्या आहेत त्या लक्षात घेऊन त्याची पुनरुक्ती तुमच्या आमच्या राज्यात किंवा जैतापूर परिसरामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये होता कामा नये, अशा प्रकारची सर्व खबरदारी केंद्र सरकार आणि राज्य सरकार घेत आहे, ही गोष्ट सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावी. अजूनही यामध्ये आमची चर्चा करण्याची तयारी आहे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत असे म्हणाले की, तुम्ही चर्चेला का घाबरता ? आम्हालाही कळते की चर्चा करुन जे काही समज-गैरसमज असतील त्या बाबतीत

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

आम्ही संयमी भूमिका घेऊ इच्छितो. ही गोष्ट सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावी. परंतु कोठे तरी एखादा पक्ष चांगल्या कामाला विरोध करीत असेल, एखाद्या चांगल्या कामाला जरी ते विरोध करीत असले तरी तो विरोध शासनाला थांबवावा लागेल. हा प्रकल्प राज्याच्या हिताचा आहे, भावी पिढीच्या कल्याणाचा आहे अशा प्रकारचा विश्वास व खात्री जोपर्यंत केंद्र सरकारची व राज्य सरकारची आहे तोपर्यंत हा प्रकल्प पुढे नेण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीतच राहणार आहे. ही गोष्ट या चर्चेच्या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावी एवढेच मी बोलतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी एक बाब प्रथम सांगू इच्छितो. परवाच्या दिवशी सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे पुणे जिल्ह्यातील मावळ येथे झालेल्या गोळीबारात 3 शेतक-यांचा मृत्यू झाला त्यासंबंधीच्या चर्चेला उत्तर देत असताना सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्य बाके वाजवून त्यांचे स्वागत करीत होते. आज देखील एका बाजूला कोकण आहे आणि तेथील मुस्लीम समाजातील 6 हजार मच्छीमार आहेत. त्यांना हे शासन या प्रकल्पाच्या माध्यमातून स्मशानात पोहोचविण्याचे काम करीत आहे. कोकणामध्ये एखाद्याची अत्यंयात्रा भजन म्हणत, टाळ, नाल वाजवित नेतात. येथे तसाच काहीसा प्रकार झाला आहे. या सभागृहात हे शासन कोकणातील माणसांना, मच्छीमारांना स्मशानात पोहोचवित असताना टाळया व बाके वाजविल्याचे मी पाहिले आहे. ते पाहून मला दुःख झाले आहे. हे सर्व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना खूष करण्यासाठी चालले आहे....

( सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुनः भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.32 ते 12.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## स्थगितीनंतर

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.**: "फॅसिस्ट शक्तीमुळे बहुजनाचे विभाजन" या सदराखाली "लोकप्रभा" अंकामध्ये केलेले आक्षेपार्ह लिखाण

**मु.शी.**: "फॅसिस्ट शक्तीमुळे बहुजनाचे विभाजन" या सदराखाली "लोकप्रभा" अंकामध्ये केलेले आक्षेपार्ह लिखाण यासंबंधी श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित केलेली बाब विशेष हक्क समितीकडे पाठविणे

**सभापती** : श्री. पुरुषोत्तम खेडेकर, लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित प्रसृत झालेल्या "लोकप्रभा" अंकात प्रा. हरी नरके यांच्या "फॅसिस्ट प्रवृत्तीमुळे बहुजनाचे विभाजन" (भाग 2) या सदराखाली लिहिलेल्या लिखाणास सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिनांक 8 ऑगस्ट 2011 रोजी तीव्र आक्षेप घेत सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला व माननीय पीठासीन अधिका-यांचा अवमान व हक्कभंग झाल्यामुळे माननीय सभापतींनी स्वत:हून हे प्रकरण चौकशीसाठी विशेष हक्क समितीकडे पाठवावे अशी विनंती केली. सदरहू चर्चेमध्ये श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, हेमंत टकले, उल्हास पवार, संजय केळकर व विनायक मेटे यांनी भाग घेत असता सदरहू लिखाणाची गंभीर दखल घेऊन त्यातील आक्षेपार्ह विधानांचा निषेध केला. तसेच सदरहू लिखाणाद्वारे सार्वभौम अशा विधानपरिषद व विधानसभा सभागृहाच्या माननीय पीठासीन अधिका-यांचा अवमान केल्यामुळे शासनाने तसेच माननीय पीठासीन अधिका-यांनी याची गंभीर दखल घेऊन अशा प्रकारच्या विकृत मनोवृत्तीचा बंदोबस्त करण्याचे प्रतिपादित केले.

या संदर्भात प्रा. हरी नरके यांच्या लेखातील खालील मजकूर आक्षेपार्ह असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"शिवाजी हे सार्वजनिक चावडीसारखे झाले आहेत. फायद्यासाठी प्रत्येकाचेच, पण करण्यासाठी कोणाचेच नाहीत (पृ.क्र.29)" अशी तक्रार करुन खेडेकर विधिमंडळावर हल्ला करताना राज्याच्या विधिमंडळानेच शिवरायांचा घोर अपमान केलेला आहे असा आरोप करतात. ते म्हणतात, "महाराष्ट्राचे विधिमंडळ व स्वत: महाराष्ट्र शासनच शिवरायांच्या बदनामीत सहभागी आहे. हा बेशरमपणाचा कळस आहे. असे विधिमंडळ व शासन संपविण्यासाठी शिवप्रेमींनी विचार करुन कृती करावी." (पृ.क्र.29,30)

खेडकर विधिमंडळाविरुध्द दंड थोपटतात आणि थेट आव्हान देतात, "विधिमंडळाने माझ्यावर हक्कभंग टाकावा" (पृ.क्र.29) महाराष्ट्र विधिमंडळ हे आव्हान स्वीकारील काय ? असा सामान्यांचा प्रश्न आहे. सार्वभौम विधिमंडळाची प्रतिष्ठा जपली गेली पाहिजे."

Erskine May यांचे Parliamentary Practice (Twenty-third edition) या ग्रंथातील पृष्ठ क्र.138 वर पुढील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

"Reflections on either House-

Indignities offered to the House by words spoken or writings published reflecting on its character or proceedings have been constantly punished by both the Lords and the Commons upon the principle that such acts tend to obstruct the House in the performance of their functions by diminishing the respect due to them."

या संदर्भात मे.कौल व शकधर यांच्या "पार्लमेंण्टरी प्रॅक्टीस आणि प्रोसिजर" या ग्रंथाच्या (सहावी आवृत्ती) पृष्ठ 293 वर पुढील प्रमाणे नमूद केलेले आहे.

"It is a breach of privilege and contempt of the House to make speeches, or to print or publish any libels, reflecting on the character or proceedings of the House or its Committees, or any member of the House for or relating to his character or conduct as a member of Parliament."

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"लोकप्रभा" मासिकातील प्रा. हरी नरके लिखित "फॅसिस्ट शक्तीमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखामधील मजकुरामुळे तसेच श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील विकृत स्वरुपातील वक्तव्यांमुळे छत्रपती शिवाजी महाराज यांची बदनामी झाली आहे. तसेच पीठासीन अधिका-यांची सर्वसामान्य जनमानसातील असलेली प्रतिमा जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सररीत्या मलिन करण्याचा प्रयत्न सदर लेखाद्वारे केला गेला असल्याने या प्रकरणात सभापतींचा तसेच सार्वभौम सभागृहाचा अवमान तसेच विशेषाधिकार भंग झाला आहे असे सकृतदर्शनी दिसून येते.

श्री. पुरुषोत्तम खेडेकर, प्रा. हरी नरके यांच्यासह "लोकप्रभा" या अंकाचे संपादक, श्री.प्रवीण टोकेकर  तसेच सदरहू अंकाचे मुद्रक, प्रकाशक, मालक व "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकाचे प्रकाशक, मुद्रक, श्री. किशोर कडू हे जबाबदार असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून या प्रकरणात सखोल चौकशी होण्याच्या दृष्टीने सदरहू प्रकरण महाराष्ट्र विधानपरिषद नियम 244 अन्वये मी माझ्या स्वेच्छा निणर्याअंतर्गत सभागृहाच्या अनुमतीने विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी पाठवित आहे.

श्री. खेडेकर यांच्या पुस्तकातील एक परिच्छेद मी या ठिकाणी वाचतो.

"शिवरायांची बदनामी विधिमंडळ व शासन थांबवू शकत नाही. त्यास व्यक्तिगत स्वरुपात विधानपरिषद सभापती श्री. शिवाजीराव देशमुख, विधानसभा अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर गृहमंत्री श्री. आर.आर पाटील, मंत्री श्री. पतंगराव कदम हेच प्रामुख्याने यास जबाबदार आहेत व इतर सर्व मराठा नेते आजही शिवरायाना अक्करमासे म्हणतात." अशा पध्दतीचे त्यांचे जे विकृत लिखाण आहे त्यानुषंगाने मी एवढेच म्हणेन की, जरी एखाद्याच्या डोक्यावर परिणाम झाला असला तरीही अशा पध्दतीचे असंबद्ध लिखाण करण्याचे धाडस कोणी करणार नाही. शिवछत्रपतींच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जनतेला, तुम्हा आम्हा सर्व प्रतिनिधींना नितांत आदर आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

आणि तो आदर सातत्याने राहील या दृष्टीने तुम्ही आम्ही कटिबध्द आहोत. या पध्दतीचे विकृत लिखाण केलेले आहे त्याच्या विरुध्द मी स्वत: अब्रू नुकसानीचा दावा दाखल करणार आहे आणि शेवटपर्यंत लढणार आहे.

----

**नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वयेची सूचना दिलेली आहे. सन्माननीय उच्च शिक्षणमंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे मंत्री महोदय सभागृहात आल्यानंतर हा विषय उपस्थित केला जाईल. आता मी प्रश्नोत्तराचा तास पुकारीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मावळ येथील घटनेच्या संदर्भात सदनामध्ये दिशाभूल करण्याचे काम माननीय गृहमंत्र्यांनी केले ही अत्यंत गंभीर बाब आहे. मावळ येथील घटनेच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहाला वेगळी माहिती दिली आणि स्थानिक पोलीस अधीक्षक सभागृहाची बैठक सुरु असताना.......

**सभापती** : मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना भाष्य करण्यास परवानगी दिलेली नाही. प्रथम प्रश्नोत्तराचा तास पूर्ण होऊ द्यावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मावळ येथील घटनेचा विषय देखील अत्यंत महत्वाचा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करुन घेऊ आणि त्या नंतर या प्रश्नासंबंधी भाष्य करण्यास मी परवानगी देईन.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**"राज्यात कृषि अभियांत्रितकी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीसाठी अतिअल्प अनुदान मंजूर केल्याबाबत"**

**अल्पसूचना प्रश्न क्रमांक-21475 श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात कृषि अभियांत्रिकी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीवर देण्यात येणारे अनुदान अतिअल्प असल्याने मोठ्या प्रमाणात प्रस्ताव कार्यवाहीविना पडून असल्याचे माहे जुलै, 2011 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील** : 1), 2) व 3) हे खरे नाही. तथापि, 100 टक्के केंद्र पुरस्कृत कृषि अभियांत्रिकीकरण योजनेंतर्गत अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना कृषि औजारांचा अनुदानावर पुरवठा करण्यात येतो. यामध्ये ट्रॅक्टरसाठी किंमतीच्या 25 टक्के किंवा जास्तीत जास्त रु.45000/- च्या मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत कार्यक्रम राबविणे क्रमप्राप्त असल्याने प्राप्त होणाऱ्या सर्व प्रस्तावांना अनुदान देणे शक्य होत नाही.

कृषि अभियांत्रिकीकरणाची वाढती मागणी विचारात घेता, सन 2010-11 पासून कृषि औजारांना 50 टक्केपर्यंत अनुदान देण्यासाठी राज्य शासनाने 25 टक्के अतिरिक्त प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे नियोजित केले व सन 2010-11 या आर्थिक वर्षामध्ये सदर कार्यक्रमासाठी राज्य शासनाने रु.400.00 लाख निधी उपलब्ध करुन दिला. तथापि, सदर निधी केंद्र शासनाच्या सन 2010-11 च्या मंजूर रु.2000.00 लाख निधीच्या तुलनेत खूपच कमी असल्याकारणाने ट्रॅक्टर व्यतिरिक्त इतर कृषि औजारांचा 50 टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात आला होता. सन 2011-12 मध्ये केंद्र शासनाच्या मंजूर रु.1600.00 लाख निधीच्या तुलनेत राज्य शासनाने रु.1000.00 लाख निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षात ट्रॅक्टरसाठी किंमतीच्या 42 टक्के किंवा जास्तीत जास्त रु.75600/- च्या मर्यादेपर्यंत अनुदान देण्याचे नियोजित केले आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

--------

..2(A)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.18198**

(माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला नाही.)

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ MMP/ KGS/ AKN/ पूर्वी श्री.शिगम... 12:55

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळया मार्गिकेत येऊन घोषणा देत असतात)

**बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेत अनुसूचित जातीतील लाभार्थी प्रवर्गासाठी शासनाने दुधाळ जनावरे विशेष घटक योजना सुरु केल्याबाबत**

**(२) * १८८८६ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेत अनुसूचित जातीतील लाभार्थी प्रवर्गासाठी शासनाने दुधाळ जनावरे विशेष घटक योजना सुरु केली असून सदर योजनेअंतर्गत २ हजार २०० प्रस्ताव निधी अभावी रखडल्याचे दिनांक ७ मे,२०११ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही. सन २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये बीड जिल्ह्यासाठी विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे या योजनेसाठी रुपये ३१.५० लक्ष इतका निधी प्राप्त झाला होता.

सदरचा निधी कोषागारातून आहरीत करुन जिल्हा निधीमध्ये जमा करण्यात आलेला आहे.

सन २०१०-११ मध्ये या योजनेसाठी जिल्हा परिषदेमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नव्हती त्यामुळे सन २०११-१२ मध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात येवून या योजनेचा लाभ संबंधित लाभार्थींना देण्याची प्रक्रिया करण्यात आहे.

(२) बीड जिल्ह्यासाठी सन २०१०-११ वर्षाकरिता रुपये ३१.५० लक्ष व सन २०११-१२ वर्षाकरिता रुपये ७०.०० लक्ष असा एकूण रुपये १०१.५० लक्ष निधी उपलब्ध असल्याने सदरची योजना सन २०११-१२ मध्ये एकत्रिपणे राबवून जिल्ह्यातील ४५३ लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेत येऊन घोषणा देत असतात)

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, शेळी, मेंढी, गाय आणि म्हैस ही सर्व दुधाळ जनावरे आहेत. या दुधाळ जनावरांची बाजारात किंमत काय आहे? दूध देणाऱ्या जनावरांची यादी आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेत येऊन घोषणा देत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना आपापल्या जागेवर बसण्याची मी विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मोकळ्या मार्गिकेत येऊन घोषणा देत असतात)

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सभागृहातील वातावरणामुळे मंत्री महोदयांना माझा प्रश्न कळलेला नाही.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहातील परिस्थितीमुळे मला कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक मी 40 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.५८ ते १.३८ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.खर्चे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या समोरील जागेत घोषणा देत असतात)

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची तेविसावी, चोवीसावी, पंचवीसावी, सव्वीसावी व सत्तावीसावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नांची तेविसावी, चोवीसावी, पंचवीसावी, सव्वीसावी व सत्तावीसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची तेविसावी, चोवीसावी, पंचवीसावी, सव्वीसावी व सत्तावीसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली याद्या छापाव्यात )

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात जलसंपदा विभागांतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांची 8 हजार 590 पदे रिक्त असल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री श्री. सतीश चव्हाण, श्री. एम.एम.शेख, श्री. विक्रम काळे, श्रीमती शोभाताई फडणवीस, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. राजन तेली, श्री. केशवराव मानकर, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. विनोद तावडे, श्री. धनंजय मुंडे वि.प.स. यांच्या दिनांक 8 ऑगस्ट, 2011 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 18594 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबतची अधिक माहिती छापावी)

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 च्या कलम 12 च्या पोट-कलम 6 अन्वये लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचा सन 2008 या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल आणि उक्त अधिनियमाच्या कलम 12 च्या पोट-कलम (5) अन्वये दिनांक 26 डिसेंबर, 2001, दिनांक 9 जून 2009, दिनांक 16 जून, 2010, दिनांक 25 जून 2010, दिनांक 8 सप्टेबर, 2010 रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सदरहू अधिनियमाच्या कलम 12 च्या पोट-कलम 7 अन्वये सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : लोक आयुक्त व उप लोक आयुक्तांचे अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

श्री. सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2009-10 चा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा 31 मार्च, 2010 रोजी संपलेल्या वर्षाचा स्वतंत्र लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2001-02 व 2002-03 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्रीमती वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2006-07 चा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 1995-1996, 1996-1997, 1997-1998, 1998-1999, 1999-2000, 2001-2002 व 2002-2003 या वर्षाचे अनुक्रमे चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा व एकतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

महोदय, तांत्रिक त्रुटीमुळे हे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यास विलंब झालेला आहे.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

श्रीमती वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2004-2005 व 2005-2006 या वर्षाचा अनुक्रमे तीसावा व एकतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**उप सभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : (अ) खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली :-

1. सन 2011 चे वि.प.वि.क्र.6-श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी)(सुधारणा) विधेयक, 2011
2. सन 2011 चे वि.प.वि.क्र.7-नागपूर सुधार प्रन्यास (सुधारणा) विधेयक, 2011

(ब) खालील विधेयकाला राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 34-महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2011

--------

......6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा अकरावा, बारावा व तेरावा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

---------

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा अकरावा, बारावा, तेरावा, चौदावा व पंधरावा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अंदाज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

......7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 9 या नियम 93 अन्वयेच्या सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : सोबत जोडलेली निवेदने छापावीत.)

--------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.**:लक्षवेधी सूचनांसबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 7 च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 229 या लक्षवेधी सूचनांसंबधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 229 ही निवेदने कृपया जोडावीत. )

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** :केंद्रशासनाने वैद्यकीय प्रवेशासाठी संपूर्ण देशात एकच सीईटी परीक्षा घेण्याबाबत घेतलेला निर्णय

**मु. शी.** :केंद्रशासनाने वैद्यकीय प्रवेशासाठी संपूर्ण देशात एकच सीईटी परीक्षा घेण्याबाबत घेतलेला निर्णय याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये सन 2012 पासून वैद्यकीय प्रवेशासाठी एकच सीईटी परीक्षा घेण्यात येतील असे सरकारने घोषित केलेले आहे. राज्यामध्ये वैद्यकीय आणि अभियांत्रिकी परीक्षांसाठी एकच सीईटी परीक्षा घेतली जात होती. परंतु नुकतेच केंद्रशासनाच्या वतीने देशभरात वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी एकच सीईटी परीक्षा घेतली जाईल असे जाहीर करण्यात आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने तातडीने उपाय योजना करावी यासाठी विशेष उल्लेखाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : एसटी महामंडळाने ठाणे ते पुणे एशियाड बस सुरु करण्याबाबत.

**मु. शी.** : एसटी महामंडळाने ठाणे ते पुणे एशियाड बस सुरु करण्याबाबत श्री. सुभाष भोईर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष भोईर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष भोईर ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

खाजगी कॉन्ट्रॅक्टरच्या एसी (वातानुकूलित ) बसला प्रवासी मिळावेत यासाठी एसटी महामंडळाने ठाणे-पुणे मार्गावरील एशियाड बस बंद करण्याचा निर्णय घेणे, एशियाडच्या तुलनेत खाजगी एसी बसचे तिकीट दुप्पट असल्याने एशियाड बस बंद केल्यामुळे प्रवाशांना दुप्पट भाडयाचा भुर्दंड नाहक सोसावा लागणे, एसटी महामंडळाचे ब्रीद वाक्य प्रवाशांच्या सोयीसाठी आहे की, "कॉन्ट्रॅक्टरच्या सोयीसाठी" असा प्रश्न प्रवाशांमध्ये निर्माण होणे, परिणामी सामान्य जनता व प्रवाशांमध्ये नाराजीची व असंतोषाची भावना निर्माण होणे, एशियाड बस सुरु करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही.

**उप सभापती** :एस.टी. महामंडळाने ठाणे-पुणे महामार्गावरील ज्या एशियाड बसेस बंद केलेल्या आहेत त्या त्वरित सुरु करण्यासंदर्भात संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी त्वरित दखल घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4 ....

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** :स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी सोनोग्राफी व्यतिरिक्त उपलब्ध माध्यमांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता

**मु. शी.** :स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी सोनोग्राफी व्यतिरिक्त उपलब्ध माध्यमांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत श्री. हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील स्त्रीभ्रूण हत्त्या रोखण्यासाठी राज्यशासनाने पुढाकार घेतलेला आहे. सोनोग्राफी सेंटर्सच्या वापरावर निर्बंधही आणलेले आहेत. परंतु वैद्यकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर होणा-या संशोधनातून नवे मार्गही उपलब्ध होत आहेत. हयाबाबतचे संशोधन जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशनमध्ये प्रकाशित झाले आहे. गर्भधारणेच्या सातव्या आठवडयातच एका साध्या ब्लड टेस्ट डिएनएच्या माध्यमातून आता लिंग निदान होवू शकेल. त्यामुळे शासनाने हयाबाबतची संपूर्ण माहिती घेवून पुढील धोरणात्मक निर्णय घेतांना उपाय योजना नक्की कराव्यात, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : नाशिक शहरातील सप्तशृंगी अपार्टमेंटमधील स्फोटात मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याची व इमारतीला जादा एफएसआय देण्याची आवश्यकता

**मु. शी.** : नाशिक शहरातील सप्तशृंगी अपार्टमेंटमधील स्फोटात मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याची व इमारतीला जादा एफएसआय देण्याची आवश्यकता याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नाशिक शहरातील सप्तशृंगी अपार्टमेंटमध्ये फटाके दारुगोळयाच्या स्फोटात 3 ठार तर 14 जखमी होणे, जिल्हा प्रशासनाकडून 3 मृतांच्या वारसांपैकी केवळ एकाच मृताच्या वारसास व तिघा जखमींनाच आर्थिक मदतीचे वाटप करण्यात येणे, उर्वरित मृतांचे वारस व जखमींना मदत देण्याबाबत जिल्हा प्रशासनाने शासनास पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असणे, दरम्यान स्फोटामुळे ही इमारत मोडकळीस येऊन धोकादायक झाल्याने या इमारतीस दुप्पट एफएसआय देऊन रहिवासी व गाळेधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेकडून शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. रहिवासी व गाळेधारकांनी कर्ज काढून या इमारतीत फ्लॅट घेतलेले असल्यामुळे त्यांच्यावर निर्वासित होण्याची आलेली पाळी. या इमारतीला शासनाने दुप्पट एफएसआयची मान्यता देणे, जोपर्यंत या रहिवाशांचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत या कुटुंबीयांना महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन केंद्र परिसरातील कॉर्टर्समध्ये कायम राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

-----

...6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

## <u>अमृत महोत्सव कार्यक्रमाची घोषणा</u>

**सभापती** : आता मी एक घोषणा करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे.

सर्व सदस्यांना विदित आहेच की, दिनांक 19 जुलै, 2011 ते 20 जुलै, 2012 हे वर्ष महाराष्ट्र विधानमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. या वर्षी अमृत महोत्सवी सोहळा साजरा करण्याच्या दृष्टीने माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, विधानपरिषद व विधानसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय संसदीय कार्य मंत्री, माननीय उप सभापती, माननीय उपाध्यक्ष, गट नेते, काही ज्येष्ठ मंत्री इत्यादींचा समावेश असलेली कार्यकारी समिती गठीत करण्यात आली असून या समितीने घेतलेल्या निर्णयानुसार अमृत महोत्सवी वर्षाचा उद्घाटन सोहळा दिनांक 19 जुलै, 2011 रोजी आयोजित केला होता. तथापि, मुंबई शहरात आकस्मिकरित्या उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेऊन आयोजण्यात करण्यात आलेला उद्घाटन सोहळा पुढे ढकलण्यात आला होता.

या द्वारे सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येत आहे की, कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार व महामहिम राष्ट्रपती महोदयांनी उद्घाटनाकरिता दिलेल्या वेळेनुसार अमृत महोत्सवी वर्षाचा उद्घाटन सोहळा मंगळवार, दिनांक 18 ऑक्टोबर, 2011 रोजी सायंकाळी 5.30 वाजता विधान भवन, मुंबई येथे महामहिम राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते आयोजण्यात आला आहे. तसेच, त्यानंतर अन्य कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 रोजी विधानमंडळाच्या विद्यमान व माजी सदस्यांकरिता विविध विषयांवर विधान भवन, मुंबई येथे परिसंवाद आयोजित करण्याबाबत कार्यकारी समितीने ठरविले आहे.

मंगळवार, दिनांक 18 ऑक्टोबर, 2011 रोजी उद्घाटनाच्या कार्यक्रमात लोकसभेच्या माननीय अध्यक्षा, माननीय राज्यपाल, राज्यातील माननीय केंद्रीय मंत्री, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री व

...7..

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** ....

केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री, देशांतर्गत विविध राज्यात राज्यपाल पदावर काम करणारे या राज्यातील मान्यवर, समाजातील काही मान्यवर व्यक्ती इत्यादींना निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच, अमृत महोत्सवी वर्षात राज्यभर विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कार्यकारी समितीने विचार केला आहे.

अत: मंगळवार, दिनांक 18 ऑक्टोबर, 2011 रोजी विधान भवन, मुंबई येथे होणाऱ्या अमृत महोत्सव उद्‌घाटन सोहळ्याकरिता व बुधवार, दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 रोजी आयोजित परिसंवादाकरिता उपस्थित राहण्याच्या दृष्टीने सर्व माननीय सदस्यांनी आपला वेळ कृपया राखून ठेवावा, अशी विनंती आहे.

कार्यक्रमाची सविस्तर निमंत्रण पत्रिका सर्व सदस्यांना वेगळी पाठविण्यात येईल.

आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

----------

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सत्रकाळातील कामकाजाचा आढावा**

**सभापती** :पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 15 एकूण काम - 102 तास 30 मिनीटे.

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 30 मिनीटे.

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 3 तास

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 99 तास

रोजचे सरासरी कामकाज - 6 तास 30 मिनीटे.

**तारांकित प्रश्न**

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 3740 कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 3198
स्वीकृत प्रश्न 1513 सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न 62

**नियम 93 सूचना --**

एकूण प्राप्त झालेल्या सूचना -158, स्वीकृत सूचनांची संख्या 56,चर्चा झालेला सूचना 18

**लक्षवेधी सूचना --**

प्राप्त झालेल्या सूचना -1173, मान्य झालेल्या सूचना 291, चर्चा झालेल्या सूचना - 29
विशेष उल्लेखाच्या 66 सूचना मांडण्यात आल्या.

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा** -प्राप्त झाल्या 14 , मान्य झाली 6 , चर्चा झाली 5
शासकीय विधेयके संमत- 12 ( परिषद 3 - सभा 9 )

**नियम 260 अन्वये** 3 प्रस्तावावर चर्चा झाली.

**अर्धा तास चर्चा** - प्राप्त झाल्या 150 मान्य झाल्या 100 चर्चा झाली 8

...........

..9..

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा** .

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार दिनांक 12 डिसेंबर, 2011 पासून नागपूर येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्ती संबंधीची घोषणा

**सभापती** : सभागृहा पुढील कामकाज संपलेले आहे. आता मी सत्र समाप्ती संबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

" मी, श्री. के. शंकरनारायणन्, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याद्वारे शुक्रवार, दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्ती बरोबरच महाराष्ट्र विधान परिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( दुपारी 1 वाजून 56 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही